◆ सप्टेंबर १९९९
◆ वर्ष तिसरे
◆ अंक नववा

# मेहता मराठी ग्रंथजगत

## — अनुक्रमणिका —

**संपादकीय** ........ २
**साहित्यवार्ता** ........ ६
**पुस्तक परिचय**
- मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही (ओशो) ........ १६
- ध्यानसूत्र (ओशो) ........ २१
- हसत-खेळत ध्यानधारणा (ओशो) ........ २६
- नष्ट मेयेर नष्ट गद्य (तसलिमा नासरिन) ........ ३०
- किनारे मनाचे : शान्ता शेळके ........ ३५
- पंचतंत्रातील कथा ........ ४१
- नवीन स्पर्धा ........ १५
- स्पर्धा निकाल ........ २०

**फुले आणि काटे** ........ ४४
**वाचकांचा प्रतिसाद** ........ ४७

☐ संपादक
सुनील मेहता

☐ कार्यकारी संपादक
शंकर सारडा

☐ संपादन सहाय्य
सुनीता दांडेकर

☐ अंकाची किंमत १० रु.
वार्षिक वर्गणी ८० रु.

☐ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी

☐ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

***संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,*** मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०.
***मांडणी-अक्षरजुळणी : मेहता पब्लिशिंग हाऊस,*** १२१६ सदाशिव पेठ, पुणे-३०.
फॅक्स : ०२०-४४७५४६२

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

# नीरदबाबू-ब्रिटिशप्रेमाचे निखळ प्रतीक

शंभरी ओलांडलेला भारतीय लेखक विसाव्या शतकाच्या अखेरीस दिवंगत व्हावा हा एक योगायोगच म्हणायला हवा. नीरद चौधरी यांना खऱ्या अर्थाने विसाव्या शतकाचे प्रतीक म्हणता येईल. नीरदबाबूंचे दि. १ ऑगस्ट रोजी एकशेएकाव्या वर्षी देहावसान झाले. हिंदुस्थान आणि इंग्लंड यांच्यातील भावबंधाचे नीरदबाबू हे एक चमत्कारिक उदाहरण होते. १९५१ मध्ये 'ऑटोबायोग्राफी ऑफ ॲन अननोन' इंडियन हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. हे पुस्तक त्यांच्या आयुष्यातील स्थित्यंतराला कारण ठरले. कारण ते ब्रिटिश साम्राज्याला अर्पण केले होते. अर्पण पत्रिकेत म्हटले होते, 'To the memory of the British India because all that was good and living within us was made, shaped and quickened by the same British rule.' भारताविषयीची तुच्छता त्यांच्या या पुस्तकातून प्रकट होत होती, ब्रिटिश राज्य आणि इंग्रजी भाषा याबद्दल भक्तिभाव होता. त्या पुस्तकावरून ते भारतविरोधी आहेत असा ग्रह होणे स्वाभाविक होते. इंग्लंडमध्ये या पुस्तकाचे जोरदार स्वागत झाले. त्यांच्या लोकप्रियतेमुळे लंडनमधील भारतीय अस्वस्थ झाले. हा कोण नीरद चौधरी अशी त्यांनी भारत सरकारकडे, पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंकडे, इंदिरा गांधींकडे विचारणा केली. भारताविरुद्ध गरळ ओकणारा हा लेखक दिल्ली आकाशवाणीवर वार्ता संकलक आहे असे कळल्यावर त्या वेळचे नभोवाणी मंत्री बाळकृष्ण केसकर यांनी नीरद चौधरी यांना नोकरीवरून काढून टाकले आणि नीरदबाबूंच्या भारतविषयक अप्रीतीला कडवटपणाची जोड मिळाली. १९५६ मध्ये त्यांना इंग्लंडचा दौरा करण्याची संधी मिळाली. वाचकचाहत्यांनी त्यांच्याभोवती गराडा घातला. भारतात असे वाचक-मित्रांचे प्रेम कधी त्यांना लाभले नव्हते. १९६७ मध्ये त्यांचा इंग्लंडमध्ये एका पुरस्काराच्या निमित्ताने दौरा झाला. त्या वेळी त्यांच्या चाहत्यांनी त्यांच्यावर पुन्हा प्रेमाचा वर्षाव केला. त्यांच्या भारतविरोधाची धार अधिक तीक्ष्ण झाली होती. भारतात राहून



क्षणोक्षणी त्यांची कुचंबणा होत होती. त्यांची घुसमट जाणून काही मित्रांनी तुम्ही इंग्लंडमध्ये का नाही स्थायिक होत असे त्यांना सुचवले. १९६८ मध्ये नीरदबाबूंनी दिल्लीला रामराम ठोकला. भारत सोडून ऑक्सफर्डला प्रयाण केले. तेथेच घर घेतले. लेखनाद्वारे पैसा मिळवला. ऑक्सफर्ड-केंब्रिज युनिव्हर्सिटी म्हणजे इंग्लंडमधील बौद्धिक तीर्थक्षेत्रे. नीरदबाबूंनी ऑक्सफर्डजवळच घर घेतले आणि पुस्तकांच्या गराड्यात राहून सतत लेखनचिंतनात स्वतःला झोकून दिले. इंग्लंडमधील विचारवंतांनाही त्यांच्याबद्दल आकर्षण असते. संभाषण कुशलता व हजरजबाबीपणा, परखड मते आणि विक्षिप्त विधाने यामुळे नीरदबाबूंशी गप्पा म्हणजे कोणालाही मेजवानी वाटे. अफाट वाचन, भन्नाट मतप्रदर्शन, ज्ञानाचे स्वतंत्र आकलन व वर्गीकरण यामुळे नीरदबाबूंचे व्यक्तिमत्व खळबळजनक व वादग्रस्त बनले आणि त्यातच त्यांना आनंद व सार्थक वाटे. टीकेची त्यांनी कधीच पर्वा केली नाही. भारतीय लोक त्यांना ऑक्सफर्डमध्ये भेटत तेव्हा काहीसे चक्रावूनच असत. नीरदबाबूंच्या उपरोध-उपहासाच्या माऱ्यात कुठला विषय येईल याचा नेम नसे. 'माझी जडणघडण ब्रिटिश राज्यात, एडवर्ड आणि व्हिक्टोरिया यांच्या राजवटीत बंगालमध्ये झाली; फाळणीनंतर बंगालमधून त्या संस्कृतीचे उच्चाटन झाले आहे. त्यामुळे मी भारतापासून दूर आहे ह्या भावनने कधी मी अस्वस्थ होत नाही.' असे ते म्हणत ब्रिटिश राणीने या विचारवंताला कमांडर ऑफ दि ब्रिटिश एम्पायर हा सर्वोच्च सन्मान दिला. इंग्लंडमध्येही सारे काही आलबेल नाही. नीरद बाबू तेथील सद्यःकालीन घडामोडींमुळे आपले वाग्बाण तेथेही सोडत. परंतु शतकपूर्तीकडे जाणारा विचारवंत म्हणून कोणी त्यामुळे दुखावल्याची भावना न दाखवता, त्यांना आदरच दाखवत. गेल्याच वर्षी त्यांच्या शतकपूर्तीनिमित्त त्यांच्याविषयी मान्यवरांनी लिहिलेल्या लेखांचा संग्रह प्रसिद्ध झाला. त्यांनी स्वतः लिहिलेल्या 'दाय हँड ग्रेट ॲनार्क,' या पुस्तकाचेही प्रकाशन झाले. ''तुमचे आजोबा-पणजोबा कसे राहात, कसे वागत, काय खातपीत, कशासाठी संघर्ष करीत हे तुम्हाला सांगण्यासाठीच जणू माझा अवतार झाला आहे.'' असे नीरदबाबू ब्रिटिशांनाच बजावून, त्यांच्या इतिहासाचे विश्लेषण मार्मिकपणे करून दाखवत. ते फक्त बीए होते, ऑक्सफर्डला राहत असूनही तेथील कुठली पदवी त्यांनी घेतली नव्हती. फ्रेंच, जर्मन, लॅटिन, ग्रीक वगैरे भाषा त्यांनी स्वयंअध्ययनाद्वारेच आत्मसात केल्या. युरोपियन इतिहास आणि संस्कृती यांचा त्यांचा व्यासंग थक्क करणारा होता. पाच फूट अर्धा इंच उंचीची ही बटू मूर्ती, ऑक्सफर्डमध्येही घरी धोती कुर्त्यात वावरत असे. ''सरव्हायव्हल ऑफ दि अनफिटेस्ट'' याचे आपण उदाहरण आहोत असे ते अभिमानाने सांगत. दि. कॉंटिनेंट ऑफ सर्स या पुस्तकाला उफ कूपर स्मृती पुरस्कार मिळाला. मॅक्समुल्लर आणि रॉबर्ट क्लाइव्ह यांची चरित्रे त्यांनी लिहिली. 'भारतीय आहार घेऊन कोणीही चांगले इंग्लिश लिहू शकणार नाही.' 'गुड इंग्लिश कॅन नेव्हर बी रिटन ऑन ए डाएट ऑफ इंडियन फूड' असे ते

म्हणत. नीरद बाबूंच्या या तऱ्हेवाईक व्यक्तिमत्त्वाचे कुतूहल दीर्घकाळ वाटत राहील.

## इंटरनेटवर ग्रंथविक्रीच्या संधी

*ॲमेझॉन कॉम,*

*बार्नेस अँड नोबल कॉम,*


ही इंटरनेटवरील पुस्तकांची दुकाने एकमेकांशी जबरदस्त स्पर्धा करणारी मानली जातात. इंग्लिश भाषेतील कोणतेही पुस्तक हवे असेल तर त्यासाठी या ग्रंथविक्रीकेंद्राचे सहाय्य घ्यायला हरकत नाही. अक्षरशः लाखो पुस्तके वेबसाइटवर उपलब्ध आहेत. दुर्मिळ, जुनी, वापरलेली पुस्तकेही तुम्हाला 'बुक फाइंडर.कॉम' वरून मिळवता येतात. जगातील हजारो ग्रंथविक्रेत्यांकडे असणाऱ्या जुन्या पुस्तकांची माहिती या वेबसाइटवर मिळू शकते. ॲडव्हान्स्ड बुक एक्स्चेंज (ABE CWWW.abebooks.com) या इंटरनेट दुकानात ४६०० पुस्तक विक्रेत्यांकडील १ कोटी १० लाख पुस्तकांची नोंद आहे. ॲमेझॉन कॉम कडे मात्र जुन्या पुस्तकांची मागणी नोंदवू नये, पुस्तक शोधण्यासाठी ॲमेझॉन. कॉम मोठे शुल्क आकारते. पुस्तकाच्या किंमतीपेक्षाही हे शुल्क कितीतरी पट जास्त असू शकते. त्यामुळे त्यासाठी स्वतःच शोध घेणे फायदेशीर ठरते. बुकफाइंडर.कॉम (www.bookfinder.com) या साइटवरूनही जुन्या पुस्तकांचा तसेच कुठल्याही नव्या पुस्तकाचा तपास लावता येतो. जुन्या पुस्तकाची अवस्था कशी आहे हेही स्पष्ट दिलेले असते.

तंत्रज्ञानावरील पुस्तकांसाठी पोर्टलँडमधील पॉवेल्स या ग्रंथविक्रेत्याची ख्याती आहे. त्यांच्या वेबसाइटचे नाव आहे (www.powells.com)

इंग्लिश व्यतिरिक्त अन्य जागतिक भाषांसाठीही अशा वेबसाइट आता तयार होऊ लागल्या आहेत. केंबिज-मॅसॅच्युसेटस येथील शोएनहॉफ या विक्रेत्याकडे निरनिराळ्या ४०० भाषांतील शब्दकोश, व्याकरण, अंकलिप्या, ज्ञानकोश उपलब्ध आहेत. साइटचे नाव आहे. www.schoenhofs.com.

इंटरनेटवरील जगातील सर्वात मोठी पुस्तक प्रकाशन-विक्री क्षेत्रातील संस्था म्हणून बार्नेस अँड नोबल या संस्थेचा दबदबा आहे. तिच्यापुढे ॲमेझानने आता मोठेच आव्हान उभे केले आहे. ॲमेझानने बेस्टसेलर पुस्तकांवर चाळीस-पन्नास टक्के सवलत देऊन ग्रंथ ग्राहकांना आकृष्ट करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

मराठी पुस्तकांनाही इंटरनेटमुळे अधिक मागणी येऊ शकेल. घरोघर संगणक-इंटरनेट होणे त्यासाठी आवश्यक आहे. येत्या पाचदहा वर्षात टेलिव्हिजनप्रमाणेच संगणकही घरोघर पोचतील. भावी काळ हा आशादायक आहे असे मानून पुढे जायला हवे.



– संपादक



**अनिल मेहता यांचे दिल्लीतील चर्चासत्रात भाषण**

नॅशनल बुक ट्रस्ट आणि फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स यांच्या विद्यमाने दि. १८ व १९ ऑगस्ट रोजी नवी दिल्ली येथे भारतीय भाषांतील प्रकाशन व्यवसाय : समस्या आणि भवितव्य या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिलभाई मेहता यांना त्यात भाग घेण्यासाठी पाचारण करण्यात आले होते. त्यांनी प्रकाशक, ग्रंथवितरक आणि ग्रंथपाल यांच्यातील सुसंवाद व सहकार्य या विषयावर आपले विचार मांडले. त्या सत्रामध्ये फेडरेशनचे अध्यक्ष एस. बलवंत, अनुराग मोदी (वाराणसी), डॉ. एस. सी. विश्वास (मुस्लिम लायब्ररी कलकत्ता) यांनीही भाग घेतला.

भारतीय भाषांमधील पुस्तकांचे अनुवाद यावर साहित्य अकादमीचे सचिव प्रा. के. सच्चिदानंद यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद झाला. या चर्चासत्राचे उद्घाटन दैनिक जागरणचे संपादक खासदार नरेंद्र मोहन यांनी केले. दिनानाथ मल्होत्रा, डॉ. सुमितेंद्र नाडिग (नॅशनल बुक ट्रस्ट), आशा राणी प्रभुतींनी त्यावेळी आपले विचार मांडले.

## दिवाळीनिमित्त खास दीपावली योजना

या महिन्यापासून तीन महिन्यात **१०००** रुपये भरा व दिवाळीच्या सुट्टीत **१५००** रुपयांची आपल्या पसंतीची पुस्तके मिळवा. त्वरा करा. या योजनेचे सभासद व्हा व दीपावलीचा आनंद द्विगुणीत करा. सभासद होण्यासाठी आपल्या नाव व पत्त्यासह आपला पहिला हप्ता मनीऑर्डर अथवा ड्राफ्टद्वारे त्वरीत पाठवा.

**आमचा पत्ता :** मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६ सदाशिव पेठ, पुणे ३०

# साहित्य वार्ता

## जुन्या मराठी शब्दांचा कोश पॉप्युलर प्रकाशनतर्फे प्रसिद्ध

''आधुनिक जगात प्राचीन मराठी वाङ्मयाचे महत्त्व कितपत उरले आहे हे माहीत नाही. या वाङ्मयाच्या अभ्यासाकडे नव्या पिढीतील अभ्यासक वळताना आढळत नाहीत,'' अशी खंत प्राचीन मराठी वाङ्मयाच्या अभ्यासक ॲन फेल्डहाऊस यांना वाटते.

पॉप्युलर प्रकाशनचा डॉ. शं. गो. तुळपुळे व ॲन फेल्डहाऊस संपादित 'अ डिक्शनरी ऑफ ओल्ड मराठी' हा प्राचीन मराठी शब्दकोश पुणे विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते प्रकाशित झाला, डॉ. मु. श्री. कानडे, दिलीप पुरुषोत्तम चित्रे व डॉ. भाऊ मांडवकर यांनीही आपली मते मांडली.

डॉ. तुळपुळे यांनी प्राचीन मराठी शब्दकोशाचे काम सोळा वर्षांपूर्वी सुरू केले. शिलालेखांपासून वारकरी साहित्यापर्यंतच्या प्राचीन मराठी वाङ्मयात आढळणाऱ्या अठरा हजार शब्दांचे अर्थ या कोशात आहेत. या शब्दांचा वापर असलेली अवतरणेही देण्यात आली आहेत. शब्द रोमन लिपीतदेखील लिहिण्यात आल्याने अमराठी भाषकांनाही हा कोश उपयुक्त ठरणार आहे. डॉ. तुळपुळे यांचे १९९४ मध्ये निधन झाल्यानंतरही फेल्डहाऊस यांनी हे काम चिकाटीने पूर्ण केले.

मराठी कोशवाङ्मयाची परंपरा समृद्ध करणारा हा कोश आहे, असा गौरव डॉ. कानडे यांनी केला. हा कोश अभ्यासकांना उपयुक्त ठरेल, असे डॉ. मांडवकर यांनी सांगितले. प्राचीन मराठी भाषेतील कित्येक शब्द वऱ्हाडात व कोकणात अजूनही जिवंत आहेत, असे त्यांनी सोदाहरण सांगितले व याचा स्वतंत्रपूर्ण अभ्यास व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.



मराठीचे पहिले सहस्रक संपत असतानाच 'सुरवाती'च्या मराठीचा शब्दकोश प्रकाशित होत असल्याचे श्री. चित्रे यांनी लक्षात आणून दिले. त्यांनी 'प्राचीन मराठी' (ओल्ड मराठी) या शब्दप्रयोगाला आक्षेप घेतला. प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन अशी विभागणी मराठी भाषेच्या संदर्भात योग्य नाही, त्यामुळे 'सुरवातीची मराठी' (अर्ली मराठी) असा शब्दप्रयोग करावा, असे त्यांनी सुचवले. कोशनिर्मितीसाठी किंवा कोशचिकित्सेसाठी योग्य माणसांची संख्या कमी होत असल्याने यापुढे अशी कोशनिर्मिती कितपत होईल, अशी शंका त्यांनीही व्यक्त केली.

विद्यापीठातील सध्याचे अभ्यासक्रम व संशोधन प्राचीन वाङ्मयाच्या अभ्यासासाठी पोषक नाही, याची जाणीव डॉ. कोत्तापल्ले यांनी करून दिली; मात्र मराठीच्या भवितव्यासाठी प्राचीन साहित्याचा नव्याने अभ्यास केला जाण्याची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले. पॉप्युलर प्रकाशनचे रामदास भटकळ यांनी स्वागत केले.

## 'अष्टगंध'चा वर्धापन दिन

ज्ञानाबरोबरच संस्काराचे महत्त्व माणसाने ओळखून नव्या पिढीला ते ज्ञान देण्याची सिद्धता केली आणि शिक्षणाचा प्रारंभ झाला. शाळा व गुरू या दोन्ही संस्था अस्तित्वात आल्या. मिळालेले ज्ञान ग्रंथनिर्दिष्ट करण्यात आले. विविध कलांचा उदय झाला. कलाज्ञानाच्या प्रसाराचे विविध मार्ग आणि ललित साहित्याचे ग्रंथ यातूनच संस्कृतीला वळण मिळाले, असे विचार कविवर्य प्रा. शंकर वैद्य यांनी 'अष्टगंध' नियतकालिकाच्या दहाव्या वर्धापन दिन कार्यक्रमात केले. ज्येष्ठ पत्रकार दलितमित्र यशवंत पाध्ये अध्यक्षस्थानी होते.

व्यक्तींच्या भावभावनांचे पोषण आणि भावविश्वाचा विकास ग्रंथांमधूनच घडत असतो. परिपूर्ण व्यक्तिमत्त्वाची घडण होण्यासाठी तसेच रसिकत्वाच्या व निर्मितीक्षमतेच्या वाढीसाठी ग्रंथाची कास धरण्याची गरज आहे. रसिक व्यक्तिमत्त्व जगाचा अर्थ जाणू शकते आणि अक्षरांतून विश्व पाहता येते असेही वैद्य यांनी सांगितले.

'अष्टगंध'चे संचालक लक्ष्मण कोकाटे यांनी स्वागत केले. साहित्यिक वामन देशपांडे, लक्ष्मण केळकर यांची भाषणे झाली. विविध क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान करणाऱ्या ११ व्यक्ती, तसेच मराठी वृत्तपत्र लेखक संघ या संस्थेला 'अष्टगंध पुरस्कार' प्रदान करण्यात आले. पुरस्कारप्राप्त व्यक्तींमध्ये वामन देशपांडे (साहित्य), आशा सावंत (ग्रामीण पत्रकारिता), कमलाकर भागवत (संगीत), नीता सावंत (ग्रामीण शिक्षण), नंदकुमार पाटील (पत्रकारिता), अनिल गावंड, रवींद्र मालसुरे (समाजसेवा), योगीराज जाधव (योगसाधना), अरविंद शर्मा (नाट्य अभिनय), गणपत तांबे (सहकार) आणि दिशा पगारे (शिक्षण) यांचा समावेश होता.

## 'गजाआड'चे प्रकाशन

''आणीबाणीचा अपवाद सोडला तर लोकशाहीच्या माध्यमातून उत्तम राज्यव्यवस्थेचा अनुभव भारताने साऱ्या जगाला दिला आहे,'' अशा शब्दात केंद्रीय गृहमंत्री लालकृष्ण अडवानी यांनी भारतातील लोकशाहीचा गौरव केला.

महाराष्ट्राचे अर्थमंत्री महादेव शिवणकर आणीबाणीच्या काळात कारागृहात स्थानबद्ध होते. त्या वेळी त्यांना आलेल्या अनुभवांच्या आधारे त्यांनी लिहिलेल्या 'गजाआड' या पुस्तकाचे प्रकाशन ८ ऑगस्टला अडवानींनी केले. उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे अध्यक्षस्थानी होते. मुंबईच्या गायत्री प्रकाशनने हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे.

आणीबाणीत १७ महिने सहा दिवस कारागृहात स्थानबद्ध असताना जी रोजनिशी लिहिली, त्या आधारे पुस्तकाची निर्मिती झाल्याचे श्री. शिवणकर यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे 'केसरी'चे संपादक अरविंद व्यं. गोखले यांनी 'गजाआड'मधले अनुभव रोमांचकारी असल्याचा उल्लेख केला.

आरोग्यमंत्री डॉ. दौलतराव आहेर, आमदार प्रकाश जावडेकर, माजी खासदार अण्णा जोशी कार्यक्रमास उपस्थित होते. 'गायत्री प्रकाशन'चे संचालक मोहनकुमार पाटील यांनी स्वागत केले. सुधीर गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले.

## ज्ञानेश्वर महाराज समाधी संस्थानचे सुधाकर जोशी मुख्य विश्वस्त

आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर महाराज समाधी संस्थानच्या मुख्य विश्वस्तपदी उत्कर्ष प्रकाशनचे संचालक सुधाकर वा. जोशी यांची निवड झाली. संस्थानचे विश्वस्त म्हणून १९८९ पासून ते काम पाहत आहेत. यापूर्वी १९९२ व ९३ मध्ये ते मुख्य विश्वस्त होते. या काळात राज्य शासनाकडून २५ लाख रुपये निधी मिळवून ज्ञानेश्वरीची स्वस्त आवृत्ती प्रकाशित करण्यास संस्थेने सुरवात केली. पालखी सोहळ्यासमवेत समग्र संतवाङ्मयाचा विक्री विभाग सुरू करण्याची कल्पना त्यांनी प्रत्यक्षात आणली. संस्थानचे संदर्भ ग्रंथालय व हस्तलिखित संग्रहालय अभ्यासकांना खुले करण्याचा विचार असल्याचे त्यांनी सांगितले.

## ज्ञानेश्वरीची वेबसाईट

भारतीय विद्या भवनचे अध्यक्ष मधुकर यार्दी यांनी इंग्रजीत भाषांतरित केलेल्या ज्ञानेश्वरीच्या वेबसाईटचे ३१ जुलै रोजी उद्घाटन करण्यात आले.

संस्थेच्या महादेव बळवंत नातू सभागृहामध्ये सायंकाळी साडेपाच वाजता डॉ. विजय भाटकर यांच्या हस्ते उद्घाटन कार्यक्रम झाले. आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील जिज्ञासू अभ्यासकांना संस्थेच्या वेबसाईटद्वारे इंग्रजीतील ज्ञानेश्वरी आता वाचता येईल, असे संस्थेचे मानद सचिव एस. आर. रायरीकर यांनी म्हटले.



## प्रा. व. बा. बोधे यांना आचार्य अत्रे साहित्य पुरस्कार

आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा आचार्य अत्रे साहित्य पुरस्कार प्रसिद्ध ग्रामीण साहित्यिक प्रा. व. बा. बोधे यांना, तर पत्रकारिता पुरस्कार श्रीकृष्ण नेवसे यांना देण्यात आला.

आचार्य अत्रे यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त १३ ऑगस्ट रोजी आचार्य अत्रे साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले. त्या वेळी प्रसिद्ध साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदार उपस्थित होते.

## मातृभाषा हा संस्कृतीचा मूलाधार

''मातृभाषा ही संस्कृतीचे मूळ असते. मूळ हलू लागले तर संपूर्ण संस्कृतीचा डोलाराच कोसळण्याची भीती असते. त्यामुळे मातृभाषेचे संवर्धन करणे गरजेचे आहे,'' असे मत 'सकाळ' वृत्तपत्रसमूहाचे मुख्य संपादक विजय कुवळेकर यांनी कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे मे १९९९ मध्ये घेण्यात आलेल्या 'साहित्यभूषण' परीक्षेच्या पुरस्कार वितरणप्रसंगी व्यक्त केले. न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी अध्यक्षस्थानी होते. कुवळेकर म्हणाले, ''दूरचित्रवाणीच्या एका खोक्यामुळे जग जवळ आलेही असेल; पण माणूस माणसापासून दूर होत आहे. मुलांच्या मनात जीवनाच्या अवास्तव कल्पना बिंबविल्या जात आहेत. स्त्री ही केवळ उपभोग्य वस्तू आहे, अशी प्रतिमा निर्माण केली जात आहे. ही जीवनशैली निखळ नाही. 'वापरा आणि फेका' या उक्तीनुसार माणसाला वागवले जात आहे की काय, अशी शंका मनात निर्माण होत आहे. खोक्यातले जीवन खरे आणि खरे जीवन खोटे मानले जात आहे. ही परिस्थिती चिंताजनक आहे. इंग्रजीयुक्त मराठी बोलले जात आहे हे सांगताना ते म्हणाले, ''इंग्रजीत बोलणे हे प्रगतीचे लक्षण मानले जाऊ लागले आहे. त्याला शिक्षक-पालकही जबाबदार आहेत. मातृभाषेतील गोडवा जर ते मुलांना समजावून सांगत नसतील, तर मुले तरी भाषेकडे कसे लक्ष देतील? इंग्रजीचे आक्रमण थोपवा, असे म्हणणे म्हणजे इंग्रजी शिकू नका असे नव्हे. इंग्रजी यायला हवी; पण कोणतीही दुसरी भाषा येण्यासाठी मातृभाषा न बोलणे हे चुकीचे आहे.... मातृभाषेतून लिखाण, वाचन कमी झाल्याची खंत वाटते. अलीकडे लिहिणे, वाचणे कमी होऊन फक्त 'बघणे'च राहिले आहे. सर्वत्र संवाद थांबल्याने विचारही थांबले आहेत. विचारांना उच्चार, आचार यांची जोड दिली जात नाही. ती द्यायची तर वाचन हवे. क्रांती विचाराने येते. विचार भाषेतून येतात आणि भाषाच प्रभावी नसेल तर संस्कृती टिकत नाही.''

पुरस्कार विजेत्यांतर्फे शिरीष जोशी व नागपूरच्या विजया ब्राह्मणकर यांनी मनोगत व्यक्त केले. परीक्षा समितीचे प्रमुख ज्येष्ठ समीक्षक डॉ. चंद्रकांत वर्तक यांनी प्रास्ताविक केले. भावना भार्गवे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. वृंदा भार्गवे यांनी आभार मानले.

## फुले-आंबेडकर संस्थेचे पुरस्कार

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्थेचे पुरस्कार तीन ग्रंथांना दिले गेले. प्राचार्य गजमल माळी यांच्या 'महात्मा फुले आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर' या ग्रंथास प्रथम क्रमांकाचा पुरस्कार देण्यात आला. डॉ. यशवंत मनोहर यांच्या 'आंबेडकरी चळवळीतील अंतर्विरोध' आणि दादू मांद्रेकर यांच्या 'बहिष्कृत गोमंतक' या ग्रंथांनाही गौरविण्यात आले.

''देशातील धर्मनिरपेक्षतेचा पाया उखडून टाकण्याचा प्रयत्न धर्मांध शक्तीकडून होत आहे,'' असा आरोप ज्येष्ठ विचारवंत डॉ. मा. प. मंगुडकर यांनी केला.

''महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांच्या विचारांची सनातन्यांनी सदैव टवाळी केली. त्यांच्या कार्याची दखल न घेता वैयक्तिक टीका करण्यात आली. सनातनी परंपरेतील काही व्यक्ती आजही समतेचा विचार दूर सारण्याचे काम करीत आहेत. या सनातनी विचारांना गाडून टाकण्याचे काम पुरस्कारप्राप्त ग्रंथांमुळे सुलभ होईल.''

डॉ. श्रीधर गुप्ते म्हणाले, ''फुले-आंबेडकरांमुळे राज्याचे स्वरूप पुरोगामी राहण्यात यश मिळाले. बंधनात अडकलेल्या समाजाला याच पुरोगामी विचारांनी मुक्त केले. या पुरोगामित्वाची कास विद्यार्थ्यांनी धरली पाहिजे. केवळ व्यावसायिक शिक्षणात न रमता सामाजिकतेचाही विचार केला पाहिजे.''

या पुरस्कारामुळे आजपर्यंत केलेल्या कामाला पावती मिळाली आहे, अशी भावना श्री. माळी यांनी व्यक्त केली. ''सामाजिक समतेचे ब्राह्मण हे शत्रू नाहीत, हे समजून घ्यायला हवे. मत मांडताना अतिरेकी स्वरूपाची भूमिका बाजूला सारून सामाजिक एकतेची मूठ बांधली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीतील नेत्यांनी गोव्यातील दलितांकडे दुर्लक्ष केले, त्यामुळे गोव्यातील दलित अद्यापही बंधनातच आहेत, असे श्री. मांद्रेकर यांनी सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष एस. एम. डावरे यांनी प्रास्ताविक केले. कार्याध्यक्ष डी. टी. सावंत यांनी आभार मानले. डॉ. डी. टी. सावंत यांनी आभार मानले. डॉ. डी. एस. गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले.

## कादंबरी हा प्रकार समाजाच्या गरजेनुसार बदलत राहतो.

आधुनिक समाजाच्या जन्माबरोबर जन्माला आलेला कादंबरी हा साहित्यप्रकार निर्मितीचे सर्वांत सशक्त माध्यम आहे. समाजाच्या गरजेनुसार त्याचा आकार आपोआप बदलतो. त्यासाठी वाङ्मयीन बंड करण्याची गरज भासत नाही, असे मत प्रसिद्ध साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी व्यक्त केले.

वामन मल्हार जोशी यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्र साहित्य परिषदेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात 'समाज आणि कादंबरी' या विषयावर ते बोलत होते. कादंबरीच्या जन्मापासून ते आताच्या काळापर्यंतच्या प्रवासाचा आढावा घेत, या वाङ्मयप्रकाराचा समाजाशी असलेला अन्योन्य संबंध त्यांनी स्पष्ट केला. महाराष्ट्रामध्ये आधुनिकतेतून जन्माला आलेला एकेश्वरवाद रुजत असतानाच कादंबरीचा जन्म झाला. बुद्धिवाद, भौतिकवाद आणि समाज वा निसर्गाच्या बंधनाच्या पलीकडे जाण्याची सहजप्रवृत्ती या आधुनिकतेशी संबंधित भावनांचा मुक्त आविष्कार कादंबरीत झाल्याचे दिसून येते. त्या अर्थाने आधुनिक संस्कृतीमध्ये कादंबरी अपरिहार्य होती, हे लक्षात येते.

''वाङ्मयाच्या प्रचंड डोंगरांवर खोदलेली शिल्पे म्हणजे कादंबऱ्या! ज्यांना इतिहासात काहीही स्थान नसते; पण आपल्या भावना व्यक्त करायच्या असतात, अशी मध्यमवर्गीय माणसेच सहसा कादंबऱ्या लिहितात. त्यामुळे या कादंबऱ्याच नंतरच्या काळात सामान्य माणसाचा इतिहास सांगतात. अर्थात, कादंबरी लिहिणे म्हणजे निव्वळ हकिगतकथन मात्र नव्हे.''

कविता, कथा या वाङ्मय या प्रकारांना पुढे सरकविण्यासाठी त्यामध्ये बंड करावे लागते.

कादंबरीच्या बाबतीत मात्र त्याची मुळीच गरज नसते. समाज आणि संस्कृतीच्या प्रवाहीपणाबरोबर कादंबरी आपोआप बदलत जाते.

कादंबरीला आकार कधी आणि कशामुळे येतो, हे सांगताना ते म्हणाले, ''समाजाविषयी काय म्हणायचे आहे, याचे लेखकाला आरंभापासूनच अखेरपर्यंत भान असावे. आणि त्या सूत्राशी लेखक प्रामाणिक असेल व त्याच्याशी सुसंगत भूमिका असेल, तर कादंबरीला आकार येतो, मात्र कादंबऱ्या हाताळण्यासाठी वस्तुनिष्ठता ठेवावी लागते. व्यक्तिरेखा प्रत्ययकारी असाव्या लागतात.''

आताच्या समाजामध्ये चिंतन करण्याला आणि अंतर्मुख होण्याला कोणाला वेळच नसल्याने समाजपरिवर्तनाशी असलेली कादंबरीची गाठ सुटते की काय अशी भीती डॉ. यादव यांनी शेवटी व्यक्त केली. साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी प्रास्ताविक केले, तर नंदा सुर्वे यांनी आभार मानले.

## विदर्भ साहित्य संघाने अव्वल साहित्याचे व्यासपीठ बनावे

''विदर्भ साहित्य संघ हे अव्वल साहित्य संस्कृतीचे व्यासपीठ बनले पाहिजे. त्यासाठी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी कठोर आत्मचिंतन करण्याची व नव्या दिशा शोधण्याची गरज आहे,'' असे प्रसिद्ध समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी प्रतिपादन केले. विदर्भ साहित्य संघ आणि नागपूर विद्यापीठ या दोन्ही संस्थांनी 'झोपी गेलेला प्रदेश' ही निर्माण झालेली विदर्भाची प्रतिमा दूर केली पाहिजे. साहित्य संघाने विदर्भाची ओळख बदलण्यासाठी चिरस्थायी कामे केली पाहिजेत.''

"हे वर्ष अतिशय महत्त्वाचे आहे. स्वतंत्र विदर्भ आंदोलन सध्या गती घेत आहे. शिवसेना आणि कम्युनिस्ट पक्ष सोडला तर कुणाचाही स्वतंत्र विदर्भाला विरोध नाही. त्र्यं. गो. देशमुख, नासिकराव तिरपुडे, बनवारीलाल पुरोहित आदी नेत्यांमध्ये नवा उत्साह संचारला आहे. काँग्रेस व भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनीही याबाबत उत्साह दाखविला आहे. विदर्भातील जनता मात्र कार्यप्रवण नाही. वेगळ्या राज्यास ती अनुकूल आहे; पण सक्रिय नाही. पुण्यात पिण्याचे पाणी दहा मिनिटे उशिरा आले तरी वर्तमानपत्रात पत्र असते. ही जागरुकता विदर्भात आली तर स्वतंत्र विदर्भ चळवळ यशस्वी होईल. यासाठी साहित्यिकांनीही प्रयत्न करणे आवश्यक आहे."

'नागपूर विद्यापीठ हे पुरोगामी विद्यापीठ आहे,' असे सांगून ते म्हणाले, "या विद्यापीठावर हिंदी आणि बंगाली भाषांचे वर्चस्व होते. त्यामुळे या विद्यापीठाचे 'व्यक्तिमत्त्व' वेगळेच होते. मुंबई-पुण्यापेक्षा विदर्भातील शैक्षणिक वाढ वेगळ्याच साच्यात झाली. विद्यापीठ व विदर्भ साहित्य संघ या दोन्ही संस्था विदर्भाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत."

"या दोन्ही संस्थांना चिंतन करायला सांगावे, तर त्यांना विरोध केल्यासारखे वाटते. हे चित्र बदलले पाहिजे. दोन जुळे भाऊ असतात; पण त्यांच्यात काही मूलगामी वेगळेपण असते. एक एका पेशीपासून जन्माला येणारे व दुसरे दोन वेगवेगळ्या पेशींपासून जन्म घेणारे. या दोन्ही बालकांत राग, अहंगंड हे विकार सारखेच असतात. हा फरक मूलतः असतो. विद्यापीठ व विदर्भ साहित्य संघाची स्थिती तशीच आहे. उत्साह खूप आहे; पण त्यामागे ज्ञानाची बैठक नाही. गेल्या ७५ वर्षांत काय केले, कसे केले, त्या वेळची सांस्कृतिक मूल्ये जाणून घेण्याचा प्रयत्न होत नाही. चर्चा होत नाही," अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

'नागपूर विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांच्या खूप अपेक्षा आहेत,' असे सांगून ते म्हणाले, "स्पर्धा परीक्षांत मराठीचे महत्त्व वाढते आहे. विद्यापीठाने त्याची दखल घ्यायला हवी. नेटसेटसाठी मुंबईला जावे लागते. ते केंद्र नागपूरला होईल, असा प्रयत्न व्हायला हवा.

कविभूषण दादासाहेब खापर्डे यांनी सुरू केलेल्या या संस्थेला पु. य. देशपांडे, विमलाबाई देशपांडे, प्रा. कुसुमावती देशपांडे, अ. ना. देशपांडे ऊर्फ कवी 'अनिल', ना. रा. शेंडे, नाना जोग यांनी ऊर्जितावस्था प्राप्त करून दिली. माजी उपमुख्यमंत्री, विदर्भवादी नासिकराव तिरपुडे यांनी संघाला प्रयत्नपूर्वक अर्थसहाय्य मिळवून दिले. त्यात ना. रा. शेंडे यांचाही सिंहाचा वाटा होता. श्रीमंत धनवटे यांच्या सहकार्याने संघाची इमारत उभी झाली. त्या वेळी 'युगवाणी' या संघाच्या मासिकाला बा. ना. देशपांडे आणि वामनराव चोरघडे यांनी नावारूपाला आणले. पूर्वी संघात ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, श. दा. पेंडसे अशा मातब्बर लेखकांची व्याख्याने व्हायची. वाङ्मयीन अस्मितेचे, मराठी संस्कृतीचे संवर्धन मोठ्या प्रमाणात सुरू असे. अलीकडे साहित्य संघाला आर्थिकदृष्ट्या भक्कम करण्याचे प्रयत्न



सुरू आहेत. सांस्कृतिक संघाचे संकुल पूर्णत्वास येत आहे. ही चांगली गोष्ट असली तरी एकूणच साहित्यविषयक व्यवहार ठप्प झाले आहेत. श्रोत्यांची उपस्थिती कमी होते आहे. पत्रकारांची तटबंदी उभी करून प्रश्न सुटणार नाहीत, याची जाणीव पदाधिकाऱ्यांनी ठेवावी. आणि आत्मघातकी मुत्सद्देगिरीपेक्षा अव्वल दर्जाचे साहित्य कसे निर्माण होईल, याकडे लक्ष द्यावे" अशी त्यांची अपेक्षा आहे.

### 'अक्षरलेणी'चे प्रकाशन

डॉ. मधुकर कुलकर्णी यांनी लिहिलेल्या अक्षरलेणी या पुस्तकाचे प्रकाशन समाजविज्ञानकोशकार स. मा. गर्गे यांच्या हस्ते दि. ४ ऑगस्ट रोजी पुण्यात झाले. मराठ्यांच्या इतिहासातील ओजस्वी पत्रांचा संग्रह या पुस्तकात आहे. बरीच पत्रे मोडी लिपीत आहेत, मोडीचे ज्ञान असल्याशिवाय मराठा इतिहासातील कागदपत्रांचे संशोधन करणे शक्य होणार नाही असे प्रतिपादन डॉ. शोभना गोखले, प्रा. सदाशिव आठवले, डॉ. एन. जे. सोनवणे यांनी केले. मानसन्मानचे रवींद्र कुलकर्णी यांनी स्वागत केले.

### उत्तम वाचक पुरस्कार

नाशिकच्या रसिक वाचक वाचनालयाच्या वतीने दरवर्षी कॉम्रेड प्रभाकर वैद्य स्मृतिपुरस्कार उत्तम वाचकाला देण्यात येतो. १९९९ च्या पुरस्कारासाठी श्रीमती शोभना गोखले यांची निवड झाली. मनोहर शहाणे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. मुंबईच्या दंगलीत मारले गेलेले पोलीस अधिकारी नंदकुमार गोखले यांच्या त्या मातोश्री आहेत. (संपर्क–दिगंबर गाडगीळ ३९ आनंदवन, कॉलेज रोड, नाशिक ४२२००५.)

### अशोक बेंडखळे यांना बालसाहित्य पुरस्कार

सी. डी. देशमुख या पुस्तकाबद्दल अशोक बेंडखळे यांना नवी दिल्लीच्या राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचा (एन सी ई आर टी चा) पुरस्कार जाहीर झाला आहे. दहा हजार रुपयांचा हा पुरस्कार आहे.

### श्रीनिवास भणगे यांना नाट्ययोगी पुरस्कार

नाट्य चित्रकला अकादमी व नाट्य चित्रवती यांच्यावतीने देण्यात येणआरा नाट्ययोगी पुरस्कार प्रसिद्ध नाटककार व पटकथाकार श्रीनिवास भणगे यांना दि. १५ ऑगस्ट रोजी प्रदान करण्यात आला.

### सुधीर भोंगळे यांना विखे पुरस्कार

'राजकारण पाण्याचे' या ग्रंथाबद्दल सुधीर भोंगळे यांना अकरा हजार रुपयांचा पद्मश्री

विखेपाटील पुरस्कार दि. २६ ऑगस्ट रोजी प्रा. वसंत बापट यांच्या हस्ते देण्यात आला. अहमदनगर जिल्हा उत्कृष्ट साहित्य पुरस्कारासाठी रूपसावली या कादंबरीबद्दल डॉ. तानाजी पाटील यांची निवड करण्यत आली. त्या शिवाय चिंताक्रांत मुलखाचे सदन (महेंद्र भवरे), ओढ (मीनल कुलकर्णी) आणि जात्यावरील ओव्या (सुधाकर भुसाळ) या तीन पुस्तकांनाही प्रत्येकी ३ हजार रुपये पुरस्कार म्हणून देण्यात आले. पुरस्कार निवड समितीत रावसाहेब कसबे, प्रा. मेधा काळे प्रा. विजय कसबेकर, डॉ. गोपाळराव मिरीकर, प्रा. शंकरराव दिघे यांचा समावेश होता.

### उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात तुलनात्मक भाषा व साहित्य विभाग

पदव्युत्तर वर्गाच्या या नव्या विभागात मराठी, हिंदी, इंग्रजी या तीन प्रमुख भाषांचा तौलनिक अभ्यास होणार असून मराठी भाषेचे स्थान अर्थातच प्रथम क्रमांकाचे आहे. सध्या जरी तीनच भाषांचा अभ्यास असला तरी ही संख्या नंतर वाढवता येईल. संस्कृत, उर्दू, गुजराथी, तामिळ या भाषांचाही समावेश करता येईल, अशा रचनेमुळे भारताचा दक्षिण-उत्तर विभाग साधला जाईल. प्राचीन-अर्वाचीन संवाद साधेल. प्रांताप्रांतात संवाद होऊ शकेल. तौलनिक अभ्यास ही संकल्पना भाषांच्या संदर्भात केंद्रीय मानून वाङ्मय वाङमयेतिहास, समीक्षाशास्त्र, वादसंकल्पना, वाङ्मयातील नवे प्रवाह, वैचारिक वाङ्मय भाषाविज्ञान भाषांतरविद्या, भाषांतरित साहित्य, लोकसाहित्य, दलित साहित्य, बोली या सर्व घटकांचा समावेश या अभ्यासक्रमात आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी विशेष विषय घेऊन पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर वर्गासाठी (एम.ए.) या विभागात प्रवेश मिळू शकेल.

पहिल्या वर्षासाठी तिन्ही भाषांमध्ये तौलनिक भाषा आणि वाङ्मयाचा अभ्यास (मराठी, हिंदी, इंग्रजी) तौलनिक भाषा विज्ञान (मराठी, हिंदी, इंग्रजी) भाषा आणि वाङ्मय इतिहास (१९६० पर्यंत) शैली विज्ञान किंवा अनुवादित साहित्य, समीक्षाशास्त्र, समकालीन भाषा आणि वाङ्मय (१९६० नंतर), लोकसाहित्य (भारतीय इंग्रजी साहित्य), किंवा बोलींचा अभ्यास, अशा एकूण ८ पेपर्सचा अभ्यास विद्यार्थ्यांना करता येईल.

उत्तर महाराष्ट्रात विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. एस. एफ. पाटील यांच्या नेतृत्वाखाली 'तुलनात्मक भाषा आणि वाङ्मय' हा विभाग सुरू होत आहे. प्राचार्य डॉ. माळी (अमळनेर) प्रा. रविकिरण झोळ (अधिष्ठाता, कला व ललितकला विद्याशाखा (उ.म. वि.), डॉ. श्रीपाल सबनीस (धुळे), डॉ. किंबहुने (औरंगाबाद), डॉ. मु. ब. शहा (धुळे), डॉ. विश्वास पाटील (शहादा), डॉ. गोखले (पुणे) यांचा समावेश आहे. तसेच डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर (मुंबई), डॉ. भालचंद्र नेमाडे (मुंबई), डॉ. चंद्रशेखर जहागिरदार (कोल्हापूर), डॉ. रमेश वरखेडे (नाशिक), डॉ. निशिकांत मिरजकर (दिल्ली), डॉ. आनंद यादव (पुणे), डॉ. गणेश देवी (बडोदा) या तज्ज्ञांचे सहकार्यही मिळणार आहे.



## नवीन स्पर्धा

### स्पर्धा क्र. १

**पुस्तके व लेखक यांच्या जोड्या. लावा बक्षीस मिळवा**

*गट १ – बलुतं, स्वामी, सोनेरी सावल्या, नेताजी, आपण सारे अर्जुन, कोलाज, कांचन कण, कथा सावलीची*

*गट २ – शिवाजी सावंत, आनंद यादव, वि. स. खांडेकर, दया पवार, व. पु. काळे, शिरीष पै, शांता शेळके, रणजित देसाई, वि. स. वाळिंबे, माधवी देसाई, मीना प्रभु, निरंजन घाटे, महादेव मोरे.*

### स्पर्धा क्र. २

**एक डेअरिंगबाज पुस्तक ओळखा आणि बक्षीस मिळवा**

हा उतारा कोणत्या पुस्तकातील आहे त्या पुस्तकाचे नाव पोस्टकार्डवर लिहून कळवा.

*"देवाची दया आणि माझे नशीब चांगले म्हणून मी कठोर परिश्रम करू शकले आणि जे मिळवायचे होते ते मिळवू शकले. ईश्वराच्या कृपेने प्रत्येक आव्हानाकडे शिकण्याची एक संधी म्हणून मी पाहू शकले, स्वतःला वाढू देण्याची संधी, स्वतःची परीक्षा घेण्याची संधी, मी कोण आहे ते शोधण्याची संधी. कधीही हार मानायची नाही, प्रयत्न सोडून द्यायचे नाहीत हे मी आयुष्यात सुरुवातीलाच शिकले होते. आजही मी याच तत्त्वाला चिकटून आहे. जे नैतिकदृष्ट्या चुकीचे आहे त्याविरुद्ध लढायला मी शिकले होते. आजही परिणामांची तमा न बाळगता मी तेच करते. भोवऱ्यात उडी घेण्यापूर्वी मी त्याची खोली कधीच मोजली नाही. मी उडी घेतली, कारण माझ्या सदसद्‌विवेकबुद्धीची ती मागणी होती. माझ्या दृष्टीने परिणामांपेक्षा नीतिपूर्ण स्वत्व जास्त महत्त्वाचे होते."*

बरोबर उत्तर पाठवणाऱ्यांपैकी लॉट टाकून येणाऱ्या पहिल्या तीन स्पर्धकांना प्रत्येकी शंभर रुपयांची पुस्तके बक्षीस. **उत्तरे पाठवण्याची मुदत– २० ऑक्टोबर १९९९**

**आमचा पत्ता :** मेहता मराठी ग्रंथजगत १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.


पुस्तक परिचय

**मी कुठल्याच धर्माचा नाही. माणसाला कुठल्याच धर्माची गरज नाही**

## मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही : ओशो

**अनु. मृणालिनी गडकरी**

ओशो रजनीश यांनी आपण जगातील कुठलाही धर्म मानत नाही असे सांगून, त्या सर्व धर्मांच्या आणि धर्मसंस्थापकांच्या मर्यादा स्पष्ट करणारी व्यक्तव्ये वेळोवेळी केली, त्याचे संकलन 'मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही.' या पुस्तकात करण्यात आले आहे. परंपरागत किंवा संघटित धर्म मोडीत काढणाऱ्या ओशोंच्या लेखी मानवी मनातील धार्मिकता-नैतिकता-जागृती यांचे मोल मात्र मोठे आहे. त्यांचे विचार अनेकांना धक्कादायक वाटतील, पाखंडी वाटतील, निर्दयी व निष्ठुर वाटतील. परंतु त्यांच्या प्रतिपादनाची पद्धत आणि त्यांच्या युक्तिवादातील सरळपणा हा देखील रोखठोक आणि चिंतनाला चालना देणारा वाटेल. ''मी कुठल्याच धर्माचा नाही. म्हणून मला भीतीही वाटत नाही. माझं कोणतंच तत्त्वज्ञान नाही. मी कुणावर संस्कार करत नाही. उलट संपूर्ण मनुष्यजातीला नैतिक आणि धार्मिक संस्कारांतून मुक्त करण्याची माझी इच्छा आहे.'' असे ओशो म्हणतात.




या पुस्तकाचे दोन भाग आहेत. 'धर्म नाही धर्मात' या पहिल्या भागात तेरा प्रश्नांची विस्तृत उत्तरे आहेत. खरा धर्म काय आहे? माणसाला धर्माची आवश्यकता आहे का? ईश्वराच्या अस्तित्वासाठी सैतानाची आवश्यकता आहे का? ईश्वराकडे एक नियंत्रक शक्ती म्हणून पाहण्यात काय गैर आहे? ईश्वराला परमपिता मानणे चूक आहे का? विशिष्ट धर्माची शिकवण पाळताना अपराधीपणाची भावना का सतावते? आपलं एक अंग दुसऱ्या अंगाविरुद्ध लढतंय असं का वाटतं? खरी प्रार्थना कुठली? नैतिकता आणि धर्म यातील संबंध नेमका काय आहे? सर्व धर्म हे कामवासनेच्या विरोधात का आहेत? एडससाठी धर्म जबाबदार आहे असे आपण का म्हणता? धर्माच्या नावावर धर्मसंस्थांची संघटित गुन्हेगारी चालते हे खरे का? तथाकथित धर्मांनी माणसाचं सर्वात जास्त नुकसान कोणतं केलंय?

या प्रश्नांच्या अनुषंगाने ओशोंनी आपल्या धर्मविषयक कल्पना आग्रहाने आणि आक्रमकपणे विशद केल्या आहेत.

दुसऱ्या भागाला 'धार्मिकता म्हणजे जीवनकला' असे नाव दिले असून त्यात नऊ प्रवचनांद्वारे धार्मिकतेद्वारे ओशोंना अभिप्रेत असणाऱ्या सत्य, आनंद, जीवनप्रेम, ध्यान, हास्य, अवेअरनेस (जागृती), एकाग्रता, बुद्धत्व, मौनाचा रसास्वाद वगैरे कल्पनांवर प्रकाश टाकला आहे. ज्ञानप्राप्ती किंवा जागृती ही सहजपणे होऊ शकते, त्यासाठी काही प्रयास करण्याची गरज नाही, तणावरहित निष्क्रियता व प्रयत्नशून्य मौन या स्थितीतच हजारो फुलांच्या वर्षावाप्रमाणे ज्ञानाची बरसात होते असे ओशो म्हणतात. हेच आपले पूर्ण तत्त्वज्ञान आहे असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र ज्ञान किंवा जागृती ही सर्वात कठीण गोष्ट आहे, त्यासाठी आयुष्यभर तपश्चर्या करावी लागते, अनेक जन्म घ्यावे लागतात; बुद्धत्वाच्या जवळ पोचल्यावरही तुम्ही भरकटू शकता, असे सर्व धर्म सांगतात. आत्मप्रकाशाचा विस्फोट झाला की निर्मळ शून्यता जाणवते, शांतीनं, प्रकाशानं, सुगंधानं, सौंदर्यानं भरलेल्या या अपरिमित शून्यतेत प्रवेश झाला की ईश्वराच्या किंवा ओशोंच्या शब्दात 'भगवतेत प्रवेश' झाला असे समजायचे. भगवतेत बुडी मारून बाहेर आल्यावर तुमचा जणू कायाकल्पच झालेला असेल. सर्व मुखवटे गळून पडतील आणि तुम्हाला खराखुरा चेहरा प्राप्त होईल. स्वतःच्या अंतरातल्या कमळाचा शोध म्हणजे धर्म. पाण्यात असूनही कमळाप्रमाणे अलिप्तभावाने या जगात तुमचा वावर होऊ लागेल. अशी भूमिका ओशो यांच्या या विवेचनातून स्पष्ट होते. 'स्वतःला समजून घेणं– आत्मज्ञान होणं हेच एकमेव पुण्य आहे.'

''माझा कुठल्याच धर्मावर विश्वास नाही.'' असे ओशो पुनःपुन्हा सांगतात. ईश्वर ही तुमच्या मार्गातील सर्वात मोठी धोंड आहे. धर्मग्रंथ हे माणसामाणसांत फूट पडतात. प्रत्येक धर्मग्रंथ स्वतःलाच प्रमाण मानतो. इतर धर्मग्रंथ त्याज्य ठरवतो. त्यामुळे संघर्ष अटळ होतो. बायबलमधील पाचशे पृष्ठे अश्लीलतेने, कामुकतेने लडबडलेली आहेत. ओल्ड टेस्टामेंट हे जर ईश्वराने लिहिलेले आहे असे मानले तर, हा ईश्वर म्हणजे एक अश्लील साहित्यिक मानावा लागेल. वेदांची रचना ईश्वरानं केली ही समजूत म्हणजे शुद्ध मूर्खपणा आहे. कारण त्यात इतक्या बाष्कळ, निरर्थक, विसंगत गोष्टी आहेत. (७१) येशू ख्रिस्त हा एक मनोरुग्ण होता असा निष्कर्ष आधुनिक मानसशास्त्रज्ञांनी काढला आहे. (६८) स्वतःला ईश्वराचा पुत्र

म्हणवून घेणे, मी मसीहा आहे आणि सर्व जगाला पापातून आणि त्रासातून मुक्त करायला आलो आहे असे सांगणे हे सामान्य निकोप माणसाचे लक्षण नव्हे. तो मेगॅलामॅनियाक होता. (६९). हे सर्व धर्म म्हणजे माणसांचं शोषण करणारी बांडगुळे आहेत. हे धर्म लोकांना गुलाम बनवत आहेत.

जगात सुमारे तीनशे धर्म आहेत. परंतु अजूनपर्यंत खरा धर्म पृथ्वीवर अस्तित्वातच आलेला नाही. (४) जोपर्यंत धार्मिकतेचं वातावरण निर्माण होत नाही आणि त्या वातावरणात अवघी मानवजात बुडून जात नाही तोपर्यंत खरा धर्म अस्तित्वात येऊच शकत नाही. संघटना किंवा संप्रदाय बनू न शकणाऱ्या धर्मालाच धार्मिकता म्हणण्यावर माझा भर आहे. धार्मिकता ही एका व्यक्तीची संपूर्ण अस्तित्वाबरोबर, समष्टीबरोबर घडणारी आणखीनच महान प्रेमपूर्ण घटना आहे. धार्मिकता ही वैयक्तिक व खाजगी बाब आहे. व्यक्तीकडून समष्टीला पाठवलेला प्रेमसंदेश म्हणजेच धार्मिकता.

सृष्टीपाशी कृतज्ञतेनं वागणं हा धर्म आहे.

कृतज्ञतेची भावना हाच काय तो धर्म आहे. त्यासाठी हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन अशा विशेषणांची गरज नाही. (४८)

धर्म म्हणजे मनाच्या पलीकडे जाण्याचा मार्ग. मन अनेक भागात विभागलं गेलंय. तुम्ही बहुचित्तवान आहात. जेव्हा तुम्ही त्याच्या पलीकडे जाता तेव्हाच तुम्हाला चैतन्याचं ज्ञान होतं. अविभाज्य चैतन्याचं ज्ञान म्हणजे सर्वज्ञान. (१७)

प्रत्येक धर्मानं भय आणि हाव यांचा विचार करून आपापल्या आज्ञा बनवल्या आहेत. त्या एकापेक्षा एक विचित्र आणि अस्वाभाविक आहेत. (१३)

जगातील जवळजवळ प्रत्येक जातीनं ईश्वराची संकल्पना स्वीकारलेली आहे. ही फक्त एक मानसशास्त्रीय समस्या आहे. हिचा कोणत्याही धर्माशी किंवा तत्त्वज्ञानाशी संबंध नाही. (२६)

आपल्या शरीराचं सुख घ्या, ऐहिकाचा उपभोग घ्या. त्यात काही पाप नाही. त्यामागेच तुमचा आध्यात्मिक विकास, आत्मिक आनंद लपला आहे. झोर्बा (शरीर) आणि बुद्ध (आत्मा) यांच्यात संघर्ष नाही. झोर्बा बाणाचा नेम आहे. एक संकेत चिन्ह आहे. तुम्ही योग्य त्या मार्गाचं अनुसरण केलं तर बुद्धांपर्यंत पोहोचाल.

मी नैतिकता शिकवत नाही. नैतिकता स्वभाविकपणे आली पाहिजे. मी तुम्हाला प्रथम शिकविणार आहे तुमच्या आत्म्याची प्रचीती (५०) जी नैतिकता प्रयत्नानं येते ती अनैतिक असते. जी नैतिकता सहजपणे येते ती खरी नैतिकता. (५१)

माझं संपूर्ण तत्त्वज्ञान चैतन्याच्या विकासावर आधारलेलं आहे. तुमचं चैतन्य इतकं उच्च पातळीला पोचलं पाहिजे की तुम्ही एक प्रकाशस्तंभ बनाल. प्रमादरहित स्थितीत जे कराल



ते वरदानच ठरेल. (५१)

पूर्वेकडचे सर्व धर्म ख्रिश्चन धर्माच्या तुलनेत जास्त स्वार्थी वाटतात. म्हणून तर ख्रिश्चन धर्मानं त्यांची निंदा केलीय. (३२)

ख्रिश्चन मनाला व धर्माला ध्यानाची कल्पना स्वीकारणं जड जातं. ख्रिश्चन धर्मात ध्यानाला जागा नाही. ध्यानात मग्न, मौन, शांती आणि आनंदात डुंबणारे, सत्य आणि परमात्मा प्राप्त करू पाहणारे, सगळ्या बंधनांपासून मुक्त होऊ पाहणारे लोक– ख्रिश्चनांना महास्वार्थी वाटतात. (३२)

ख्रिश्चन धर्मानं लाखो करोडो लोकांना फसवून चुकीच्या दिशेनं नेलं आहे असा आरोप ओशो करतात. (३४)

ख्रिश्चन आणि इस्लाम हे दोन्ही धर्म अविकसित आणि रानटी धर्म आहेत. त्यांच्यापाशी हिंदू, जैन, बौद्ध, ताओ ह्यांच्यासारखा सुसंस्कृतपणा व स्वच्छ दृष्टिकोन नाही. (४१)

जगातील सर्व धर्म तुमचं अहित करीत आले आहेत. ईश्वराच्या नावावर तुम्हाला कष्ट, दुःख, घृणा, क्रोध देत आले आहेत. तुम्हाला अधिक जखमी करीत आले आहेत. (५६)

ईश्वर आणि धर्म यांच्या नावावर धर्मयुद्धात आणि जिहादमध्ये करोडो लोकांची हत्या केली गेली. रोमन कॅथॅलिक चर्चचा मादकद्रव्यांचा व्यापार, दहशतवादी करवाया यात सहभाग आहे. (६४)

बौद्ध धर्माचा प्रभाव एकेकाळी इतका होता की जवळजवळ सर्व भारतभर तो पसरला. लाखो लोकांनी त्याचा स्वीकार केला. बुद्धाच्या मृत्यूनंतर या बौद्धांचा छळ केला गेला. हत्याकांड सुरू झाले. अनेक बौद्ध भिक्षू देशाबाहेर पळाले. आशिया खंड बौद्ध धर्मीय झाला. चीन, कोरिया, व्हिएतनाम, थायलंड, ब्रह्मदेश, जपान, श्रीलंका येथे बौद्धधर्माचा प्रभाव पडला. भारत सोडून सगळी पूर्व बौद्ध झाली. भारतात मात्र मागच्या २५ व्या वर्षात एकही बौद्ध उरला नाही. बौद्धधर्माचे आंदोलन हे ब्राह्मणांच्या विरोधात होते. कर्मकांड, वेद, हिंसा, यज्ञ यांच्याविरुद्ध होते. भगवान बुद्धाच्या हयातीत ब्राह्मणांना त्याचा प्रतिवाद करता आला नाही. बुद्धाच्या निर्वाणानंतर मात्र ब्राह्मणांनी उठाव करून बौद्धांची हत्या सुरू केली. जैन धर्मीयांनाही त्यांनी निष्प्रभ केले. मोगलांच्या कारकीर्दीत हिंदू आणि जैन यांच्यावर जे अत्याचार झाले त्याचा इतिहास लिहिला गेलेला नाही. भारतातील बहुसंख्य मुसलमान हे तलवारीच्या धाकानेच बाटवले गेलेले आहेत हेही विसरता कामा नये याकडे ओशो लक्ष वेधतात.

पाश्चात्त्य देशातील धर्मांनी धर्मग्रंथ प्रमाण मानून त्या विरोधात बोलणाऱ्यांची मुस्कटदाबी केली. (गॅलिलिओ, कोपर्निकस इ.) पूर्वेकडे वादविवाद, चर्चा, मतभेद यांना सतत वाव मिळत गेला.

ख्रिश्चन धर्माने परमार्थ या शब्दाचा वापर करून एक धोकादायक खेळ केला. निःस्वार्थी होणे हे आध्यात्मिक आहे असे प्रतिपादन केले. ओशो म्हणतात, ''मी लोकांना प्रथम स्वार्थी व्हा असे सांगतो. स्वचा अर्थ ओळखल्यावर, स्वतःला जाणून घेतल्यावरच निःस्वार्थी होता येईल.'' (३१)

सेवा ही ख्रिस्ती धर्माची कल्पनाही लबाडीची आहे. लोकांना दुबळे पांगळे गरजू बनवून त्यांची सेवा करण्यापेक्षा, त्यांना समर्थ बनवून सेवेची गरजच भासणार नाही. असे वातावरण निर्माण करा असे ओशो म्हणतात. (३५)

ओशो यांची ही सर्व निरीक्षणे व विधाने आपल्या सांकेतिक चाकोरीबद्ध समजुतींना छेद देणारी आहेत. आपल्याला धर्माकडे पाहण्याची नवी जाणीव देणारी आहेत. विशिष्ट धर्मातील पालकांच्या पोटी आपला जन्म झाला– म्हणूनच आपण आपल्या कुटुंबाच्या धर्माचा अभिमान बाळगतो. त्या धर्माचे कर्मकांड जमेल तेवढे आपल्या सोयीनुसार पाळतो. फारच थोडी माणसे जाणीवपूर्वक स्वतःच्या धर्माची निवड करतात. स्वतःच्या जन्मदत्त धर्माऐवजी तात्त्विक सामाजिक वैचारिक पातळीवरून अन्य धर्मात प्रवेश करतात. परंतु कुठलाही धर्म स्वीकारला तरी एक चौकट असतेच. रजनीश या सर्व धर्मांपलीकडे जायला सांगत आहेत. खऱ्या धार्मिकतेचा अवलंब करण्याचे आवाहन करीत आहेत. या दृष्टीने हे पुस्तक प्रत्येक सुजाण व्यक्तीने स्वतःची धर्मविषयक भूमिका तपासून घेण्यासाठी वाचायला हवे.

पृष्ठे १४४. नव्वद रुपये, सवलतीत ७५/- ग्रंथजगतच्या सभासदांना ६७/- पोस्टेज १५/-

**जुलै९९ स्पर्धा निकाल**

## शब्दकोडे निकाल

लेखकाच्या नावाची आद्याक्षरे-वपु

ही वाट एकटीची, पार्टनर, रंग मनाचे, वपुर्झा, माणसं, इन्टिमेट, स्वर, फॅन्टसी एक प्रेयसी, वलय, रंगपंचमी, चिअर्स, निमित्त, क क ची 'क',

**यशस्वी स्पर्धक**

**१) सुनीता प्रधान–** ४४६/२६५६ शुभलक्ष्मी नगर, गुजरात सोसा. चांदखेडा, अहमदाबाद

**२) सतिश देशपांडे–** २३-५-४४८, शाहअली बंडा, हैद्राबाद - ५३००६५

**३) शारदा गद्रे–** गांधी चौक, धारवाड - ५८०००१


अभिनंदन! आपण आपल्या पसंतीची १०० रु.ची पुस्तके कळवावीत.

**आमचा पत्ता :** मेहता मराठी ग्रंथजगत १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.



**परमात्म्याच्या प्राप्तीची ओढ खरोखरच उत्कट असेल तर ध्यान हे सर्वाधिक प्रभावी माध्यम**

ध्यानसूत्र या पुस्तकातील नऊ प्रवचने ओशोंच्या ध्यानविषयक तंत्राचा एक छोटेखानी अभ्यासक्रम सादर करतात. ध्यानाची साधना करणे हा जीवन सफल करण्याचा एकमेव मार्ग आहे असे प्रतिपादन ते करतात. आपल्या जीवनाचे आमूलाग्र रूपांतर करण्यासाठी कुठलाही धर्म व त्याचे कर्मकांड पाळण्याची जरुरी नाही. परमात्म्याच्या प्राप्तीची आस जर तीव्र असेल, सत्याचा साक्षात्कार व्हावा असे वाटत असेल, जीवनात संपूर्ण शांतीचा प्रत्यय यावा अशी आकांक्षा असेल तर त्यासाठी ध्यानाचे माध्यम सर्वाधिक फलदायी ठरेल. ''माणसाच्या चेतनेचा आणि आत्म्याचा जो अणू असतो त्याचा जर विस्फोट होऊ शकला तर ज्या शक्तीचा व ऊर्जेचा जन्म होतो, त्याचंच नाव परमात्मा. आपल्याच विस्फोटातून आपल्याच विकासातून ज्या ऊर्जेला वा शक्तीला आपण जन्म देतो, त्या शक्तीचा अनुभव म्हणजेच परमात्मा. त्याची तृष्णा जागी व्हायला हवी. ती तीव्र व्हायला हवी. ती तृष्णा नसेल तर परमात्मा प्राप्त होणार नाही. ती तृष्णा आपल्या अंतरंगात हवी, सत्य-शांती-आनंद मिळवण्याची अभिलाषा हवी. ही तृष्णा-अभिलाषा आपल्या आत आपण शोधून उत्कट पातळीवर न्यायला



हवी. आपल्या अंतर्यामी ही तृष्णा असेल तर ती भागवण्याचा मार्ग नक्की सापडेल. ती तृष्णाच नसेल तर सामान्य जीवन तेवढे चालू राहील. ती तृष्णा भागवण्याचा संकल्प आपण आशावादी वृत्तीने केला तर नक्की यश लाभेल. ती तृष्णा जागृत करायचे आवाहन ओशो करतात आणि तेही आशावादी वृत्तीने.

ही तृष्णा आहे हे एकदा स्वतःलाच जाणवले, पटले की पुढची वाटचाल सुरू होते. त्या वाटेवर मार्गदर्शक म्हणून ओशो स्वतः बरोबर येतात. प्रत्येक टप्प्यावर ते आपले अनुभवसिद्ध तंत्र विशद करून सांगतात. पुन्हा बजावतात, ''निराशेच्या भावनेने या प्रयत्नाकडे पाहू नका. निराशा म्हणजे स्वतःचा सगळ्यात मोठा अपमान. आपण निश्चित यश मिळवू. या आत्मविश्वासाने वाटचाल सुरू केली तर खरोखर आपले ईप्सित नक्की साध्य होईल.''

तीन दिवसांचे हे ध्यान शिबिर. त्यात एकूण नऊ प्रवचनांद्वारे ध्यान प्रक्रियेचे रहस्य ओशो उलगडून दाखवतात. या तीन दिवसांत जास्तीत जास्त मौन बाळगावे. बोलण्यातील शक्तीचा उपयोग साधनेत होऊ शकतो. एकांताचीही थोडी साधना या ध्यान प्रक्रियेला पोषक ठरते. निसर्गाच्या सान्निध्यात, बाह्य संभाषण बंद केल्यावर आपल्या आंतरिक चेतनेचा आवाज आपल्या कानावर येण्यास आरंभ होईल. साधनेचे जीवन हे एकट्याचे असते, समूहात ध्यान करीत असलो तरी ध्यान वैयक्तिक असते. ध्यान, समाधी हा अंतर्प्रवेशाचा प्रयोग आहे. त्यासाठी प्रथम संकल्प सोडायला हवा. पूर्ण मनानं– मला शांत व्हायचं आहे, मला ध्यान प्राप्त करायचं आहे, असा संकल्प करा. दृढपणे संकल्प दृढ करण्याचा उपाय म्हणून ओशो एक तंत्र विशद करतात.

''सगळ्यात आधी हळूहळू पूर्ण श्वास आत घ्या. सगळ्या प्राणांमध्ये, फुफ्फुसामध्ये घेता येईल तेवढा श्वास भरून घ्या. श्वास पूर्ण करल्यावर ''मी संकल्प करतो की मी ध्यानात प्रवेश करीनच.'' असा विचार मनात घोळवत राहा. या वाक्याचा पुनरुच्चार करीत राहा. ही एक अद्‌भुत प्रक्रिया आहे आणि या प्रक्रियेच्या माध्यमातून आपल्या अचेतन भागांमध्ये संकल्पाचा प्रवेश होईल असे ते म्हणतात. हा संकल्प प्रथम पाच वेळा करा. रोज झोपतानाही तो पुन्हा करा. (१७)

माणसाची सगळ्यात मोठी कृती स्वतः माणूस आहे.

माणसाची सगळ्यात मोठी निर्मिती म्हणजे स्वतःची निर्मिती.

परमजीवन किंवा परमात्मा किंवा आत्मा किंवा सत्य प्राप्त करण्यासाठी सचेतन लक्ष्याची तहान हवी. ती तहान भागवण्यासाठी चिंतनमनन हवं. जे काही घडतंय ते डोळे उघडे ठेवून चारी बाजूंनी बघा. त्या घडण्यातून चिंतन-मनन होईल; तहान जागी होईल.

त्याचबरोबर साधनेचं केंद्र किंवा साधनेचं शरीर व आत्मा हेही हवे.

साधना-साधनेचं केंद्र व साधनेचा परिणाम.

साधनेची भूमिका, साधना आणि साधनेची सिद्धी.



साधनेचा परीघ म्हणजे तुमचं शरीर. तुमच्या व्यक्तिमत्त्वाचं परीघही शरीर हेच.

शरीर हे केवळ साधन आहे. पण शरीर हे अद्‌भुत साधन आहे. एक यंत्र आहे. साधनेचा आरंभ शरीरापासून होणं आवश्यक आहे. कारण हे यंत्र व्यवस्थित केल्याशिवाय पुढं जाता येत नाही.

म्हणून पहिलं पाऊल– शरीरशुद्धी.

शरीर शुद्ध होईल तेवढं अंतरंगाच्या प्रवेशात सहभागी होईल.

शरीरशुद्धीचा अर्थ असा की शरीराच्या यंत्रणेत अडथळा आणणाऱ्या ग्रंथी आणि मनोगंड असता कामा नयेत.

शरीरशुद्धीसाठी सगळ्या योगांनी, सगळ्या धर्मांनी अनेक प्रयोग केले आहेत. शरीरात ग्रंथी निर्माण होता कामा नयेत. हे शरीरशुद्धीचं पहिलं पाऊल. मनाचं कंपन जेवढं कमी होऊ लागेल तेवढं शरीर स्थिर वाटू लागेल. शरीरशुद्धीचं पहिलं पाऊल म्हणजे शरीराच्या ग्रंथींचं विसर्जन. (२८) साधनेची ही प्राथमिक पायरी होय.

आपल्या शरीरातील शक्ती आणि ऊर्जा यांचा सृजनात्मक उपयोग करणं हा स्वर्गाचा मार्ग आहे. त्यांचा नाश करणं हा नरकाचा मार्ग आहे. (३३) सृजनात्मक कामांतून आनंद मिळतो. एकदा बिंदू निवडून सृजन करा. चित्रे काढा, कविता लिहा, मूर्ती बनवा. सृजनात काही घ्यायचं द्यायचं नसतं. फक्त करायचं असतं. त्यात आनंद असतो. (३८)

शरीर आणि मन दोन्ही संयुक्त आहेत. शरीरावर जे होईल ते मनावर होते. सम्यक आहार, सम्यक व्यायाम आणि सम्यक विश्राम याद्वारे स्वास्थ्य लाभते.

शरीरशुद्धी, विचारशुद्धी आणि भावशुद्धी हे ध्यानाचे पहिले तीन टप्पे आहे. शरीरशून्यता, विचारशून्यता आणि भावशून्यता हे ध्यानाचे दुसरे तीन टप्पे आहेत.

श्वास पूर्णपणे आत घ्या. फुफ्फुसं पूर्ण भरून घ्या. श्वास रोखणं शक्य होईल तोवर रोखून धरा. योगात पूरक, कुंभक व रेचक असे या प्रक्रियेला म्हटले आहे. (४३) त्याच वेळी संकल्प करीत राहा. तो संकल्प आपल्या पूर्ण अंतःकरणातल्या चेतन मनापर्यंत प्रविष्ट होईल. त्यातूनच संकल्पानंतरची आशा, आनंद, विश्वासाची भावना जागी होईल. आपल्या शरीराला स्वास्थ्याची, आनंदाची, भावना जाणवेल. शरीराचा कण न् कण प्रफुल्लित झाल्याचा आनंद वाटेल.

हा शांतीचा, आनंदाचा अनुभव चोवीस तास कसा टिकवून ठेवायचा याचे दोन मार्ग ओशो सांगतात.

१) ध्यानात अनुभवलेल्या चित्तवृत्तींचं सतत स्मरण करायचं.

२) रात्री झोपतानाही संकल्प प्रगाढ करीत राहायचे.

चोवीस तास त्यायोगे सतत अंतःस्मरण होत राहील. (४६)

आपल्या चित्ताची स्थिती आपण जशी टिकवून धरू तसं हे जग होत जातं. हा एक चमत्कारच

आहे. आपण प्रेमानं भरून गेलो तर सगळीकडे प्रेमच प्रेम भरलेलं दिसतं. ज्यांचं स्मरण कराल त्या घटना वाढत राहतात. ध्यानातला जो अनुभव असेल– थोडासा प्रकाश, थोडीशी शांती, थोडीशी आशा– त्यांचं स्मरण ठेवा. त्या वाढत राहतील. प्रेम करायला शिका.

याच प्रवचनात ओशो सेक्स व प्रेम यांचं स्वरूप उलगडून दाखवतात. प्रेमामुळं सेक्सचं परिवर्तन होतं. सृजनशील होतं. सेक्स ही सृजनात्मक शक्ती व्हायला हवी. (५५) जगात जेवढे महापुरुष झाले ते सर्व अत्यंत सेक्स्चुअॅलिस्ट होते. अतिकामुक होते. पण त्या कामुकतेचं रूपांतर शक्तीत झालं की स्थिती बदलते. (६७)

शरीरशुद्धी, विचारशुद्धी व भावनाशुद्धी या तिन्ही गोष्टी साधल्या तर जीवनाचा नव जन्म होतो.(६८) ही बाह्यसाधना होय. अंतरंग साधना म्हणजे भाव, शरीर व विचार यांना शून्यावस्थेत नेणे. शरीर नाही, विचार नाही, भाव नाही अशा अवस्थेत प्रवेश करणे.(६९)

परमात्म्याचा साक्षात्कार होणं हा शब्दप्रयोग ओशोंना मान्य नाही. परमात्म्याशी मीलन होतं असं ते मानतात. एका बाजूला तुम्ही, दुसऱ्या बाजूला परमात्मा– असा हा प्रकार नसतो. तुम्ही सगळ्या सत्तेत लीन होता. थेंब समुद्रात मिसळतो. त्याक्षणी जो अनुभव येतो तो अनुभव परमात्म्याचा असतो.(११२)

तपश्चर्या म्हणजे काय? हे सांगताना ओशो म्हणतात, तपश्चर्या म्हणजे आत्महत्या नाही'. मृत्यू नाही. तपश्चर्या पूर्ण जीवनाच्या प्राप्तीसाठी असते. तपश्चर्या म्हणजे पलायन नाही तर ट्रॅन्सफॉर्मेशन. (अवस्थांतरण). तपश्चर्या म्हणजे त्याग नाही तर समपरिवर्तन.(१२१)

तपश्चर्या म्हणजे कष्ट नव्हे, आत्मपीडा नव्हे, शरीरदमन नव्हे. तपश्चर्या ही काही मिळवण्यासाठी नसते. ती लोभाचं रूप प्रलोभन म्हणून समोर येता कामा नये.

शरीरातील मूलाधार, स्वाधिष्ठान, अनाहत, आज्ञा आणि सहस्त्रार या पाच चक्रांवर ध्यान केंद्रित करून त्यांना सूचना देऊन ते अवयव शिथिल करा. त्यायोगे भाव आणि विचार शून्य होतील, मन शून्य होईल. हा ध्यानाचा प्रयोग करण्याची कृतीही शिबिरात रोज आवश्यक असते.

भावाची शून्यता उसळी घेते तेव्हा सत्य उपलब्ध होते. सत्य पूर्ण मिळते. समग्र मिळते. परमात्म्याचा अनुभव हा अखंड असतो. पण त्याच्यापर्यंत पोचण्याचा मार्ग हा खूप खंडांमध्ये विभागलेला असतो. त्यासाठी टप्प्याटप्प्यातं जाणे भाग पडते. सत्य हे शब्दांमध्ये सांगता येत नाही. मानवी वाणीला अजून ते सांगणं शक्य झालेलं नाही. भाषा पुरेशी विकसित झाली तर कदाचित ते सांगता येईल. सत्य सांगता येत नाही. ते जाणता येतं. अनुभवता येतं. सत्याचा अनुभव नेहमी वैयक्तिक असतो.

ओशो रजनीश यांच्या या प्रवचनातून त्यांच्या ध्यानधारणेच्या तंत्राची सूत्ररूप कल्पना येते.

१. प्रथम साधनेच्या, ध्यानाची उत्कटतम तृष्णा निर्माण होणे. संकल्प करणे.
२. साधनेची पहिली शिडी म्हणजे व्यक्तीचं शरीर. त्याच्या शुद्धीची गरज. शरीर ग्रंथीमुक्त करणं वासनाविकारांचे गंड दूर करणे.
३. चित्शक्तीचे रूपांतर सृजनात्मक क्रियेत करणे.
४. विचारशुद्धी करणे. जो जसा विचार करतो, तसा तो होतो. म्हणून विचारांची दिशा शुद्ध झाली की तुमच्या अचार-उच्चारात फरक पडेल.
५. भावशुद्धीची कला आत्मसात करणे. भावविश्वात परिवर्तन झाल्याशिवाय विचार विश्वातील विचारांनी क्रांती होत नाही. भावाच्या चार अवस्था.
६. सम्यक् रूपांतर, तपश्चर्या, उपवास, राग-विराग-वीतराग.
७. शुद्धी आणि शून्यता यातून लाभणारी समाधी सिद्धी.
८. समाधीचे रहस्य प्राप्त झाल्यावरची अवस्था.
९. एकावेळी एकच पाऊल उचलण्याचे आमंत्रण.

या प्रवचनात अनेक मार्मिक दृष्टान्त-कथा विखुरलेल्या आहेत. भगवान बुद्ध, भगवान महावीर, येशू ख्रिस्त, महात्मा गांधी, रवीन्द्रनाथ टागोर, रामकृष्ण परमहंस इ. इ.

त्या सर्व कथांमधूनही आपल्या श्रोत्यांना व वाचकांना ओशो नव्या जाणिवांचे भान घडवतात.

एक कथा येथे देतो. ती वाचकांना अंतर्मुख करील.

एक आंधळा आणि त्याचा एक मित्र प्रवास करीत असतात. वाळवंटात एके रात्री कडक थंडीत तो आंधळा काठी म्हणून चुकून एक थंडीने गारठून कडक झालेला साप हाती घेतो. आपल्या नेहमीच्या काठीपेक्षा गुळगुळीत मऊ काठी मिळाली म्हणून तो देवाचे आभार मानतो. त्याच काठीने मित्राला ढोसून तो सकाळी झोपेतून उठवतो. मित्र साप पाहून घाबरतो, ''अरे, हा साप तू हातात का धरला आहेस? टाकून दे. चावेल तुला.'' पण आंधळा म्हणतो, ''काहीतरीच काय सांगतोस? मी आंधळा आहे. अडाणी नाही.'' मित्र म्हणतो, ''अरे तो खरोखरच साप आहे.''

थोड्या वेळाने सूर्य वर आल्यावर उन्हाने सापाचा ताठरपणा संपून तो तरतरीत होतो आणि त्या आंधळ्याला खरोखर चावतो.

ओशो म्हणतात, ''मी ज्या दुःखाची गोष्ट तुमच्यापाशी करतोय ते तेच दुःख आहे, जे त्या दिवशी सकाळी त्या डोळस माणसाला आपल्या अंध मित्राबद्दल वाटलं. मला चारी बाजूंना जे लोक दिसतात ते काठी समजून हातात साप धरून चाललेले दिसतात. मी त्यांना ते सांगू गेलो तर ते म्हणतील, मी असूयेपोटी बोलतोय. म्हणून मी हळूहळू समजावण्याचा प्रयत्न करतोय. तुम्ही जे पकडलंय ते चुकीचं आहे. आणखी पकडता येण्यासारखी चांगली काठी आहे आनंद, सत्य... आपण चुकीचं जगतोय हे लक्षात आलं तरच तुमच्यात नवी तहान निर्माण होईल.''

पृष्ठे १९६ शंभर रुपये, सवलतीत ८५/- ग्रंथजगतच्या सभासदांना ७५/- पोस्टेज १५/-


आधुनिक औषधप्रणालीत ध्यानधारणेलाही स्थान असणे अपरिहार्य

## हसतखेळत ध्यानधारणा : ओशो

**अनु. मीना टाकळकर**

‘हसतखेळत ध्यानधारणा’ हे ओशोंचे ध्यानविषयक विचार प्रकट करणारे ‘ध्यानसूत्रनंतरचे आणखी एक पुस्तक. त्याचे भाषांतर मीना टाकळकर यांनी केले आहे.

या पुस्तकात पाच प्रवचनांचा समावेश झालेला आहे. औषधयोजना आणि ध्यानधारणा, ध्यान एक शास्त्रीय दृष्टिकोन, मनाच्या पलीकडे, ध्यान-अनुभूती आणि ध्यान व रेचन अशी शीर्षके या प्रवचनांना किंवा प्रश्नोत्तरांना देण्यात आली आहेत.




तरीही त्यात अनेक विषय आलेले आहेत. आणि ओशोंच्या व्यक्तिमत्त्वाचे व विचारांचे मनोज्ञ,कधी गूढ तर प्रक्षोभक दर्शन घडते. वादग्रस्त विषय डावलण्याची चतुराई व चलाखी ओशोंना मान्य नव्हती; त्यामुळेही ते टीकेचे मोहोळ उठवत. ‘माझ्यासारख्या व्यक्तींना तर अशा अपरिहार्य स्वरूपाच्या त्रासामधून जावे लागते. तो त्रास नवा नसून जुनाच आहे. उद्या माझ्यासारख्याला माझ्याशीच संघर्ष करावा लागेल. पण माझी त्याला सहानुभूती असेल. मी तुमच्या विचारांवर, तुमच्या अस्तित्वावरही आघात करणार आहे. हा आघात शक्य तेवढा खोलवर करायचा आहे. जे परिवर्तनासाठी उत्सुक आहेत ते विधायक होऊ शकत नाही. जे विधायक



आहे त्यांनी कधी कुणामध्ये परिवर्तन घडवून आणले नाही. महात्मा गांधी किंवा विनोबा या दोघांना मी विधायक व्यक्तिमत्त्वे मानतो. त्यांच्याकडून कधीही कुणामध्ये परिवर्तन करण्याचे काम झालेले नाही.’’

स्वतःलाही ओशो कोणाचा गुरू मानत नाहीत. आपला कोणी शिष्य आहे असेही म्हणत नाहीत. स्वतःच ज्याचा त्याने आत्मरूपाचा शोध घ्यायचा असतो. मात्र मार्गदर्शक म्हणून काही मदत आपण करू शकतो असे ते मानतात.

ईश्वराचा अर्थ ते पावित्र्य असा मानतात. ईश्वर पवित्र आहे असे नाही, जे पवित्र आहे तेच परमेश्वर आहे.

ईश्वराला आपण धरू शकतो आणि सोडूही शकतो. तो परमेश्वर होऊ शकत नाही. ती आपली स्मृतीच आहे. परमेश्वर म्हणजे अशी पवित्रता की निष्पाप भावातून येते आणि जी स्मृतीच्या द्वारा चेतनेला शुद्ध व मुक्त ठेवले. (६९)

ध्यान ही ओशोंच्या मते सर्व धर्मांना मान्य असणारी गोष्ट आहे. ध्यान ही कला आहे; मनाला हलकेफुलके करणारी, निर्मळ-निर्विचार करणारी, कोमल-निर्मळ अवस्थेचा आनंद देणारी गोष्ट आहे. ध्यान ही आध्यात्मिक वा धार्मिक गोष्ट नाही. गंभीर वा वादग्रस्त गोष्ट नाही. ध्यान स्वतःचा आनंद आहे. ध्यानासाठी बाहेरच्या कोणत्याही निर्जन स्थानाचा शोध घेण्याची गरज नाही. मनुष्याच्या अंतर्यामीच एक निर्जन बेट आहे, ते ध्यानाशिवाय अस्पर्शित राहते. ध्यान ही आंतरिक गोष्ट आहे.

ध्यानधारणा ही अनेक आजारांचे निराकरण करून एका प्रभावी औषध योजनेची जागा घेऊ शकते. औषधोपचाराने मनुष्याचे वरवरचे आजार बरे होतात. पण ध्यानधारणा-ध्यान मनुष्याच्या अंतरंगात शिरून उपचार करते. औषध माणसाला बाह्य स्वरूपात बरे करण्याचा प्रयत्न करते तर ध्यान माणसाचे अंतरंग निरोगी व निकोप करण्याचा प्रयत्न करते. औषधशास्त्राशिवाय ध्यान पूर्ण होऊ शकत नाही; ध्यानाशिवाय वैद्यकशास्त्र अपूर्ण ठरू शकते. कारण मनुष्य म्हणजे शरीर आहे आणि मनही आहे. या दोहोंना स्वतंत्र मानून आजवर औषध योजनांचा विचार झाला. शरीर आणि मन ही एकच अस्तित्वाची दोन टोके आहेत. अस्तित्वाच्या एका टोकाला झालेला आजार दुसऱ्या टोकापर्यंत पोचू शकतो. शरीरावर झालेला आघात मनावर परिणाम करतो. मनावर झालेला आघात शरीराला त्रासदायक ठरतो. काहीही आजार नसणे म्हणजे पूर्ण निरोगी असणं असं नव्हे, निरोगीपणाचे स्वतःचे काही सकारात्मक निकष असतात. आजार नाही अथवा आजार नसणं हे नकारात्मक झालं. वैद्यकशास्त्र आजार काय हे शोधत राहिले, निरोगीपणा वा स्वास्थ्य काय हे शोधण्यात मागे राहिले. स्वास्थ्य म्हणजे स्वतःमध्ये स्थिर त्याला इंग्रजी पर्याय नाही. हेल्थ म्हणजे हिलिंग. बरे होणे. त्यासाठी आधी आजार असणे गृहीत धरून हेल्थ शब्द वापरला जातो.

स्वास्थ्य या संकल्पनेत आजाराला कुठेच गृहीत धरले जात नाही. स्वास्थ्य म्हणजे मुळातच रोग नसणे.

ओशोंच्या मते माणूस हा जन्माने अपूर्ण आहे. काही काम केल्यावर त्याला पूर्णत्व प्राप्त होऊ शकते. त्याची पूर्णत्व न मिळण्याची अवस्था हाच त्याचा आजार असतो. तो २४ तास अस्वस्थच असतो. आज अमेरिकेएवढा अस्वस्थ व चिंताग्रस्त दुसरा देश नाही. स्वास्थ्य हे गरीबी किंवा श्रीमंती यावर अवलंबून नसते. गरीब असोवा श्रीमंत असो, माणूस अस्वस्थच असतो नवनव्या चिंता शोधून काढतो. आपण आहोत त्यापेक्षा वेगळे काहीतरी होण्याचा माणसाचा प्रयत्न असतो. हे त्याच्या दुःखाचे आणि अस्वास्थ्याचे मूळ आहे असे ओशोंचे प्रतिपादन आहे.

या गृहीताच्या आधारे ते माणसाला शारीरिक व मानसिक या दोन्ही व्याधींतून मुक्त करू शकणाऱ्या ध्यानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी वेगवेगळे युक्तिवाद सादर करतात.

मानसिक आजार हे त्यांच्या मते बाह्यवर्ती असतात आणि शारीरिक आजार अंतर्गत असतात. मानसिक आजारावर शारीरिक दृष्टीने उपचार केले तर मानसिक आजार त्वरित दुसरा मार्ग शोधते; म्हणून मानसिक आजार बरा होण्याऐवजी वाढतच राहतो. ॲलोपथी शारीरिक व्याधींवर औषध योजना सुचवते. मानसिक आजाराबाबत निष्प्रभ ठरते. मानसिक आजारासाठी आंतरिक पातळीपासून चेतनेच्या जाणिवेच्या पातळीवर आणणारे उपचार हवे असतात. ध्यान ही गोष्ट त्यासाठी सर्वात अधिक प्रभावी ठरू शकते.

ध्यानाचा अर्थ हाच की स्वतःमध्ये जागरूकता निर्माण करणे.

ध्यानाचा पहिला अर्थ आपण आपले शरीर आणि आत्मा याबाबत जागरूकता निर्माण करणे. ही जागरूकता जशी वाढेल तसे मृत्यूचे भयही कमी होईल.

आपल्या अंतर्यामी असे काही आहे की जे अमर आहे. हे जाणवले की मृत्यूचे भय उरणार नाही. ध्यान ही त्या अमरत्वाची जाणीव आहे. जे आंतरिक अस्तित्व आहे, त्यावर उपचार करा. जमेल तितके दिवस सुखाने जगा. आणि आंतरिक आत्मा आहे त्याचे स्मरण करा. मनामध्ये ध्यान आणि बाहेर वैद्य, औषधी शास्त्र आणि ध्यानधारणा या दोहोंना ते एकाची शास्त्राची दोन टोके मानतात. शरीराची काळजी डॉक्टरने घ्यावी, अशी नवी रुग्णालयात सोय व्हावी. मनुष्य हे एक संपूर्णरूप आहे हे स्वीकारून उपचार व्हावे असे ओशो सुचवतात.

ध्यानदृष्ट्य मनाच्या पहिल्या स्तराचे नाव वाचा (वैखरी ; दुसऱ्या स्तराचे नाव मध्यमा; तिसऱ्या स्तराचे नार पश्यन्ति. या तिसऱ्या स्तरापर्यंत आपण फारसे पोचत नाही. पहिला स्तर बोलण्याचा. दुसरा विचार करण्याचा तर तिसरा स्तर प्रत्यक्ष अनुभूतीचा आहे. ध्यानाच्या दृष्टीने त्या पुढचा स्तर म्हणजे परा. या स्तरावर विचार दृष्टीला पडत नाहीत, ऐकायला येत नहीत; या दोहोंच्या पलीकडचा हा स्तर असतो. त्या चौथ्या स्तरापलीकडे ध्यानाचे विश्व सुरू होते. या चार भिंतीच्या आत आत्मा असतो; आपण मात्र बाह्यस्तराच्या भिंतीबाहेरचे जीवन जगतो. आनंद आत-अंतर्यामी आहे. तेथपर्यंत पोचण्याचा ध्यान हा एकमेव मार्ग आहे.



ध्यानापेक्षा अधिक मौल्यवान अशी कोणतीच गोष्ट नाही. ध्यान म्हणजे जीवनाचे द्वार मोठे करणे. तेथून आनंदाचे किरण खाली उतरण्यास सुरुवात होते. ज्या ठिकाणी आपण व्यवहारातून सुटून परमेश्वराशी जोडले जातो.

ध्यान हे प्रत्यक्ष करून पाहणे सोपे जाते. बौद्धिक दृष्ट्या त्याची ओळख करून देणे अवघड ठरते.

ध्यानाचे जगात ११२ प्रकार आहेत. हा प्रत्येक प्रकार ईश्वरापर्यंत पोचवणारा आहे; प्रत्येक स्वयंपूर्ण आहे. प्रत्येक प्रकार शांती, आनंद आणि सत्य यापर्यंत घेऊन जाणारा आहे.

ध्यान नीट करणे ही सोपी गोष्ट आहे. ध्यान म्हणजे जागे राहणे. झोप व्यवस्थित झालेली असेल तर सकाळी ध्यान व्यवस्थित होऊ शकेल. नाहीतर ध्यानाच्या वेळी झोप लागेल. ध्यानाच्या अवस्थेत जाण्यासाठी चांगली झोप झालेली असणे आवश्यक आहे. मनाची चित्ताची झोप ही पहिली गरज आहे.

ध्यानासाठी आहारही योग्य तेवढाच हवा. अधिक जेवणाने झोप येते. पचनासाठीही झोपेची गरज असते. जेवण समतोल व प्रमाणशीर हवे.

सुसज्ज ध्यानमंदिर उभारण्याची कल्पनाही या प्रवचनात ओशोंनी मांडली आहे.

ध्यान म्हणजे जागेपणी झोपणे. झोपेत असताना जागणे म्हणजे ध्यान.

ध्यान ही पद्धती आहे. समाधी ही उपलब्धता आहे.

स्वप्न हे अचेतन, बेहोष मनाचे चिंतन आहे. ध्यान मनाच्या पलीकडे आहे जागृत आहे.


जप करणे म्हणजे ध्यान नव्हे.

जप ही क्रिया आहे. ध्यान ही अक्रिया आहे. ध्यान म्हणजे जागरण. बघणे. साक्षीत्व.

ध्यानाद्वारे मनुष्याच्या मनात दबल्या गेलेल्या, सुप्त, दडपलेल्या भावनांपासून सुटका होते. रेचन होते. ध्यान व रेचन यांचे विवेचन ओशोंनी पाचव्या प्रवचनात केले आहे. ध्यान हे हसतखेळत, नाचत-गात व्हायला हवे. हसिबा खेलिबा धरीबा ध्यानम्. त्यायोगे जीवनयात्रा आनंदपूर्ण व्हावी असे ओशो म्हणतात.

पृष्ठे–१२८ किंमत– ७०/- सवलत– ६०/- ग्रंथजगतच्या सभासदांना ५३/- पोस्टेज १५/-

शिवाजी सावंत यांची 'शेलकी' पुस्तके



शेलका साज १२०
कांचनकण ७०
मोरावळा ६०
युगंधर श्रीकृष्ण : एक चिंतन ६०



तसलिमा नासरिनची महिलांच्या हक्कांबद्दलची आग्रही कैफियत

# नष्ट मेयेर नष्ट गद्य

**अनु. मृणालिनी गडकरी**

तसलिमा नासरिन हिच्या 'लज्जा' या कादंबरीने बांगला देशमध्ये अमाप खळबळ उडवली. तिला तेथील कडव्या सनातनी मुल्लामौलवींनी मृत्युदंडाची धमकी दिली. त्यामुळे बांगलादेश सोडून आज तिला जगभर वणवण करावी लागत आहे. भारतातही तिने आश्रयासाठी प्रार्थना केली आहे. परंतु आपले सरकार त्या बाबत नकारार्थी भूमिकाच घेत आहे. मध्यंतरी आजारी आईला भेटण्यासाठी तसलिमा बांगलादेशाला येऊन गेली; वेष बदलून नाव बदलून ती काही काळ तेथे राहिली. तरीही तिच्या येण्याची बातमी बाहेर फुटलीच; आणि तिला बांगला देशातून छुपेपणाने निघून जाणे भाग पडले.




तसलिमा ही बंडखोर मुस्लिम विचारवंत महिला म्हणून अनेक विषयांवर आपले विचार परखडपणे मांडते. स्त्रियांवर होणाऱ्या अनेकविध अत्याचारांबद्दल ती पोटतिडिकेने लिहिते. महिलांना अजूनही अनेक देशात दुय्यम स्थान आहे; त्यांच्यावर अनन्वित जुलूम होतो, पक्षपातीपणाने त्यांना वागवले जाते. राजकीय दृष्ट्या त्यांची गळचेपी केली जाते. सामाजिक



दृष्ट्या त्यांना अवमानित केले जाते. धार्मिक दृष्ट्या त्यांच्यावर अमानुष निर्बंध लादले जातात. स्त्रीला निसर्गानेच विशिष्ट क्षमता प्रदान केलेल्या आहेत; अपत्यनिर्मितीची यंत्रणा तिच्या शरीरात निर्माण केली आहे. या क्षमतेचा मानसिक, शारीरिक, सामाजिक ताणही तिला सहन करावा लागतो. विशिष्ट क्षेत्रात प्रगती करूनही स्त्रियांना त्यांचे योग्य ते स्थान देण्याबाबत खळखळ केली जाते. कायदेही स्त्रियांवर अन्याय करतात.

तसलिमा नासरिन ही केवळ मुस्लिम स्त्रियांचे किंवा बांगला देशमधील महिलांचे प्रश्न मांडत नाही. ती जगातला सर्व स्त्रियांचे प्रश्न मांडते. पाश्चात्य देशातही स्त्रियांना काही बाबतीत अवमानकारक वागणूक दिली जाते; आशियाई वा आफ्रिकन देशात तर स्त्रीला एक वस्तू म्हणूनच वागवले जाते. तसलिमाचे या सर्व स्त्रियांच्या वेदनाव्यथांशी संवेदनाक्षम नाते जडलेले आहे; आणि त्या वेदनाव्यथांचा अत्यंत निःसंदिग्ध शब्दांत आविष्कार करण्यात ती कसूर करीत नाही.

'नष्ट मेयेर नष्ट गद्य' या तिच्या नव्या पुस्तकात 'निर्वाचित कलाम' या पुस्तकातील लेखांचाच उत्तरार्ध आला आहे असे म्हणता येईल. वेगवेगळ्या विषयांवरची ६१ टिपणे वा लेख यात आहेत. पुस्तकाचे नावही मोठे मार्मिक व मर्मभेदक आहे. नष्ट मेयेर नष्ट गद्य म्हणजे 'नाठाळ बाईचे नाठाळ लेखन'. मृणालिनी गडकरी यांनी या लेखांचा अनुवाद केला आहे. ''तसलिमाचे या पुस्तकातील लेख एकांगी किंवा अगदी टोकाची विधानं करणारे नाहीत, उलट त्यातून तिची चिंतनशीलता, संवेदनशीलता, अभ्यासू वृत्ती, स्त्रियांच्या प्रश्नांविषयीची कळकळ दिसून येते. तसलिमा एका सुसंस्कृत समजाचं स्वप्न बघते आहे. पिळवणूक व अन्याय यांपासून मुक्त असा समाज तिला अपेक्षित आहे. स्वतः नास्तिक असूनही सुसंस्कृतपणा आणि संस्कृती जपणाऱ्या काही जुन्या रूढी-परंपरांची तिला ओढ आहे.'' असे मृणालिनी गडकरी यांना या लेखांचा अनुवाद करताना जाणवते. वाचकांनाही त्याची प्रचीती निश्चित येईल.

त्याच बरोबर तसलिमाच्या या लेखाचा अनुवाद करताना तिच्या विचारांचे आणि चळवळीचे औचित्य काय असाही प्रश्न मृणालिनी गडकरी या स्वतःला विचारत होत्या, सद्यःस्थितीत समाजाची मानसिकता बदलण्यासाठी असेच लेखन हवे असेही म्हणता येईल.

या लेखांमध्ये महिलांच्या प्रश्नांशी संबंधीत लेखांचे प्रमाण अधिक आहे. नारीबळी, विद्यार्थिनींची गळती, सुंदर कांती-तृष्णेची शांती, जाहिरात क्षेत्रातील स्त्री, मुलींना जन्म द्या व प्रायश्चित्त घ्या, स्त्रीचा परिचय, स्त्रियांचं कर्म, प्रत्येक स्त्री आता मशिदीची इमाम होणार, सर्व मुलं औरसच असतात, अग्निपरीक्षा, एकदोन वेश्या-पाचसात रखेल्या. बस्स जमलं, एका वाईट मुलीची गोष्ट, शब्दशरांनी घायाळ झालेली स्त्री– या शीर्षकांवरूनही त्यातील प्रतिपादनाचा रोख लक्षात येईल.

मुख्यतः पुरुषाची इच्छापूर्ती करण्यासाठीच स्त्रीला एकदा घरात कैद व्हावं लागतं तर अनेकदा घराबाहेर पडावं लागतं. स्त्री घरंदाज असो की वेश्या, स्त्री ही शेवटी स्त्रीच असते

यातना सहन करण्यासाठीच तिचा जन्म असतो. (पृष्ठ ४)

स्त्रीला समाजात एक भोग वस्तू मानलंय. धर्माची आणि समाजाची उपयुक्त सामग्री मानलंय. स्त्री म्हणजे दासी. स्त्री म्हणजे एक बाहुली. तिच्या शरीरावर डाग आहेत ते पुरुषानं केलेल्या अत्याचाराचे. खुणा आहेत करकचून आवळलेल्या वेड्यांच्या. या सगळ्यांचं चित्र रेखाटलंय कुणी? स्त्रियांच्या समस्यांचं चित्र लेखकांच्या लेखनात आहे कुठं? कुठंही नाही, साहित्य, कला, संस्कृती या क्षेत्रात वावरणाऱ्या स्त्रिया फक्त पुरुषांचं अनुकरण करतात. (पृष्ठ ३०)

स्त्रीला फक्त शारीरिक संबंधावरून पतिता ठरवलं जातं. पण कुठल्याही पुरुषाला अशी नावं ठेवून त्याचा अपमान केला जात नाही. म्हणूनच पतिता हा शब्द असभ्य आणि अश्लील मानून समाजाने हद्दपार केला पाहिजे. अनौरस या शब्दाचीही हकालपट्टी झाली पाहिजे. (पृष्ठ ४१)

प्राचीन काळी जगात पसरलेला भिन्न भिन्न समाजात कुमारिकेचा बळी देण्याचीही एक पद्धत होती. कुठं हा बळी अपत्यासाठी दिला जाई तर कुठं धरतीला सुफलाम् करण्यासाठी. कधी नदीला व जलदेवतेला प्रसन्न करण्यासाठी तर कधी महामारीपासून समाजाला वाचवण्यासाठी. भूत, प्रेताला, त्यांच्यापासून सुटका करून घेण्यासाठी किंवा युद्धात जय मिळावा म्हणूनही. (पृष्ठ ४५)

कनिष्ठ विद्यालयांपेक्षा उच्च महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या क्रमशः कमी होत जाते. जळलेल्या मुलांपेक्षा मुलींची संख्या अधिक का? याला अनेक कारणे आहेत. पहिले म्हणजे संस्कार... मुलीला थोडे लिहिता वाचता आलं की पुरे हा प्रचलित समज. दुसरं कारण म्हणजे मुलीला घरकामातच अडकवलं जाणं. शिवाय शेजाऱ्यांचे प्रतिगामी जुनाट विचार, रस्त्यांतून जाताना मवाल्यांचा त्रास.. (पृष्ठ ७०)

स्त्रिया स्त्रियांची जेवढी हिंसा करतात तेवढी पुरुष स्त्रियांची करीत नाहीत असं म्हटलं जातं. स्त्रीमध्ये कुजकेपणा, द्वेष, लोभ जास्त असतो. स्त्रीच स्त्रीचा अनादर करते. पुढे जाणाऱ्या स्त्रीच्या मार्गात स्त्रीच धोंड बनते. स्त्रीच स्त्रीचं जास्त नुकसान करते. हे नुकसान अशिक्षित बिनडोक स्त्रिया जितकं करतात त्याच्या हजारो पट जास्त उच्चशिक्षित, पदवीधर, बुद्धिमान स्त्रिया करतात. स्त्रीला एकदा एखाद्या गंडानं पछाडलं की तो असाध्य असतो. तिच्यातील विषाणू सभोवताली पसरतात आणि साथ येते. ह्या साथीत स्त्रियांचाच बळी जातो. (पृष्ठ ८०)

खाली मान घालणारी, लाजणारी, मृदुभाषी, रूप आणि संसारोपयोगी गुणांनी ओतप्रोत भरलेली अशी स्त्री म्हणजेच प्रेक्षणीय वस्तू. गमतीची गोष्ट. उपभोग्य वस्तू. एखादी स्त्री धावपटू वा पोहण्यात प्रवीण असेल तर तिचं धावण्यातील वा पोहण्यातील प्रावीण्य बघण्यापेक्षा तिच्या घाटदार मांड्या आणि भरदार उरोज पाहण्यातच लोकांना अधिक रुची



असते. (पृष्ठ ७४)

स्त्रियांच्या गर्भप्रतिबंधक शस्त्रक्रियेपेक्षा पुरुषांची नसबंदी ही शस्त्रक्रिया सोपी व कमी धोक्याची आहे. परंतु पुरुष नसबंदी टाळतो. (१३२). हा स्त्रीवरचा एक अन्यायच आहे.

तसलिमाचा आग्रह आहे की स्त्रीनेही पुरुषांच्या बरोबरीने जीवनाचा मुक्तपणे, समान पातळीवरून आस्वाद उपभोग घ्यावा. मुला-मुलींचे खेळ वेगवेगळे का असावेत असा प्रश्न ती विचारते. (पृष्ठ ५८-५९) अंगण-परांगण ह्यातही हा फरक आहे. स्त्रीनं घर, घराचं अंगण सोडून खेळण्यासाठी मोठं मैदान शोधलं पाहिजे. कॅनडातील स्त्रियांनी 'शरीराचा वरचा भाग उघडा ठेवून हिंडण्याचं-टॉपलेस पोशाख घालून समाजात वावरण्याचं-स्वातंत्र्य मिळावं म्हणून चळवळ केली; हा प्रतीकात्मक विरोध फक्त स्त्रियांवरच निर्बंध घालणाऱ्या कायद्याच्या विरोधात होता. कोणतीच स्त्री अंग उघडं टाकून हिंडणार नाही, परंतु तसा कायदा करणे हा स्त्रीचा अपमान आहे. आणि अशा कायद्याला संघटितपणे विरोध करायलाच हवा असे तसलिमाचे प्रतिपादन आहे.

'रखेली' या शब्दाला पुल्लिंगी प्रतिशब्द नाही, रखेल्या चहूकडे आहेत. पण रखेल म्हणून ठेवलेले पुरुष मात्र नाहीत. असं का?.. अमीर अरब सत्तर-ऐंशी रखेल्या ठेवतात. मग श्रीमंत बायकांनी सत्तर-ऐंशी नाहीत तर एकदोन पुरुष ठेवायचे नाहीत म्हणजे काय? फक्त श्रीमंत पुरुषांनाच हा एकतर्फी अधिकार का? पुरुष जसा चार लग्नं करून चार बायकांना घेऊन व्यवस्थित राहतो तसं आपणही चार लग्नं करून चार नवऱ्यांना घेऊन व्यवस्थित राहावं अशी माझी इच्छा होती. माझी ही इच्छा पाहून अनेक स्त्रिया उत्तेजित होतील.. चार लग्नं करणं माझ्यानं झालं नाही याचं मला वाईट वाटतं.. पण जेवढं काही मी केलं तेवढ्यानंही पुष्कळांना त्रास झालाच. खोटारड्या पुरुषांना त्रास झालेला पाहून मला अघोरी आनंद होतो. पैसे असते तर मीही रक्षित पोसले असते.. ''सत्तर-ऐंशी नाही तरी सात-आठ पुरुष ठेवणं काही वाईट नाही.'' असा आपला समानतेचा आग्रह तसलिमा कुठलाही आडपडदा न ठेवता व्यक्त करते. श्रीमंत बायकांनी अनेक पुरुष ठेवून 'रक्षित' हा शब्द यथार्थपणे प्रचलित करावा अशी सूचनाही ती करते. (८२)

'रक्षिता' प्रमाणेच गृहिणी, हाऊसवाइफ, स्वामी, प्रभू, असली (व्यभिचारिणी, कुलटा, भ्रष्ट स्त्री या अर्थाचा बंगाली शब्द), अलक्ष्मी (दुर्भाग्याची देवी, दुर्दैवी स्त्री, हतभागिनी), पतिता या शब्दांबद्दलही तसलिमाला संताप येतो. स्त्रीला माणूस म्हणून वागवा. भोग्य वस्तू म्हणून तिच्याकडे पाहू नका. रमणी, गृहिणी, अंगना हे शब्द वापरू नका असे तसलिमाचे मागणे आहे. (९०).

स्त्रीला सदोदित पणाला लावायची वस्तू असंच मानले जाते. ती 'पण्य' मानली गेल्यामुळे तुला पडद्यात राहावे लागते. लग्न ही घटना म्हणजे स्त्रीची विक्रीच होय. 'स्त्री'ला लग्न पद्धतीद्वारे घराघरात बसवलं जातं. तिथं ती उपभोगाचं एक साधन आणि अपत्य निर्माण

करण्याचं यंत्र असते. पती हीच तिची ओळख असते; अशी स्त्रीबद्दलची प्रतिमा समाजात शिष्टसंमत आहे. ती बदलण्याची गरज तसलिमा वरचेवर व्यक्त करते. पुरुषाला वर्मी लागेल असं एखादं वाक्य स्त्रियांनी तयार केलेलं नाही. चार इंचाची बहादुरी पुरे झाली आता. मुकाट्यानं रस्ता धरा यासारखा पुरुषांच्या वर्मी टोला हाणला नाही तर पुरुषांना झुलवायची संधी कधी मिळणारच नाही असे तसलिमाचे मत आहे. (११९).

वैषयिक भावना मारून जीवन जगण्यालाच समाजातील थोरामोठ्यांनी पातिव्रत्य असं नाव दिलं आहे. स्त्रीला शुद्ध ठेवण्यासाठी समाजानं चलाखीनं भोगलेल्या युक्त्यांना अंतच नसतो. पुरुषांचे कलंक, डाग, घाण स्वतःच्या अंगावर घेतल्यामुळे स्त्री घाणेरडी होते, डागाळते, कलंकित होते. अशा डागाळलेल्या स्त्रीला पुरुष नावं ठेवतो. तिचा त्याग करतो आणि दुसऱ्या स्वच्छ पाण्यात डाईव्ह मारायला जातो. हाच तर 'नियम' आहे असे उपरोधपूर्ण भाष्य तसलिमा करते. (१२९). स्त्रीवर पुरुष अधिकार गाजवतो याचं प्रमुख कारण म्हणजे 'पुरुष हा कमावता असतो हे आहे' असे कुराणात म्हटले आहे. स्त्री जर कमावती असेल तर काय हा प्रश्न महमुदाच्या डोक्यात आला नाही; परंतु सध्याच्या काळातील अरब अब्बास महमुदांनी स्त्रीनं कमावतं होण्याला मनाई करण्याचीच भूमिका घेतल्याबद्दल तसलिमा त्यांना शेलका आहेर करते. पुरुषांचे अनेक अनुभवही तसलिमाने घेतले आहेत. त्याबद्दलही ती मोकळेपणाने लिहिते. ती दहावीत असतानाच एका तरुणाने तिला प्रेमपत्र पाठवले. ते बघून घरी तिला चांगलेच ठोकले गेले. एकोणिसाव्या वर्षी तसलिमा एका तरुणाच्या प्रेमात पडली. प्रियकर शरीरसुख मागायचा. पण त्याला तिनं कटवलं. 'तुझ्याशिवाय जगू शकणार नाही' असं म्हणणाऱ्या एका तरुणानं तिच्या बॅगेतले ७०० डॉलर्स आणि तिची सोन्याची चेन घेऊन पळ काढला. एक जण दारू पिऊन यायचा आणि रात्रभर तिला पट्ट्यानं मारायचा.

आता प्रेमाच्या बाबतीत तसलिमा हिशेबीपणाने वागते. स्वतःसाठी बारा आणे आणि प्रेमासाठी चार आणे. जमलं तर ठीक, नाहीतर ज्याचा त्याचा मार्ग आहेच. तरीही तसलिमा एक कबुली देतेच. पुरुष नावाच्या प्राण्यावर तिचं खूप प्रेम आहे.

तसलिमाची ही वेगवेगळ्या विषयांवरची स्फुटे व मते तिच्या गुंतागुंतीच्या व्यक्तिमत्त्वाचीच वेगवेगळी रूपे दाखवतात. पुरुषाबद्दलचे आकर्षण, समानतेची आकांक्षा, प्रचलित धार्मिक-सामाजिक कायदेकानूंबद्दलची नाराजी, स्वतःच्या स्त्रीत्वाची जाणीव आणि ते जपण्याची तिची आकांक्षा, स्वतःची मते मांडण्यातील बेछूट प्रामाणिकपणा, इस्लामच्या कडव्या मुल्लामौलवींनी दोनदा फाशीची सजा सुनावून तिला देशोधडीला लावण्याचा टाकलेला डाव– या सर्वातूनही तिचा संघर्ष व तेजस्वी बाणा कोमेजलेला नाही. ''मी माझं जीवन लोकांपुढे पसरलंय. ते त्याच्यावर हल्ला करतात, आणि थयथय नाचतात सुद्धा. मी कधीच कुणाच्या आयुष्यात विष कालवलं नाही. कधीच कुणाचं वाईट चिंतिलं नाही. मी अगदी निरुपद्रवी, मठ्ठ, नगण्य आहे. तरीही दातओठ खात विळेकोयते घेतलेले हात मलाच शोधत येतात. मला प्रवाहाच्या विरुद्ध दिशेनं पोहत जायचंय; आणि आधार काय तो काडीचा! शत्रू वाढताहेत. पण त्यांच्यावर




नियंत्रण ठेवण्याचं कोणतंच साधन माझ्याजवळ नाही. मी रिकाम्या हातानं एकटीच उभी आहे. माझ्याजवळ पैसा नाही, यश नाही. फक्त हृदय आहे- तेही घायाळ झालेलं. माझं मन आघातांनी, आगीनं पोळलंय. मी हात जोडून क्षमा मागते. असंख्य गुणी लेखकांची, विद्वान वाचकांची, सन्मान्य शत्रूंची आणि निंदकांची! मला क्षमा करा. आता तर माझं जगणं हाही अपराधच ठरलाय. कदाचित मरणं हाही दोष धरला जाईल. दोषाच्या पंजातून माझी सुटका नाही हेच खरं!''

हे तिचं मनोगत वाचताना प्रत्येक वाचकाच्या अंतःकरणातही कुठेतरी कालवाकालव होईल.

पृष्ठे १८८. एकशेवीस रुपये. सवलत १०२/- ग्रंथजगतच्या सभासदांना ९०/- पोस्टेज १५/-


शान्ता शेळके



**यांची वाचकांशी संवाद साधणारी पुस्तके**

कादंबरी

**आंधळी (हेलन केलर) (अनु.) १००**
**आंधळ्याचे डोळे (वेद मेहता) (अनु.) १५०**
**चौघीजणी (अनु.) (मेरी आल्कॉट) ३००**

कथासंग्रह

**पावसाआधीचा पाऊस ९०**
**अनुबंध ७०**

ललित गद्य

**सांगावेसे वाटले म्हणून ९०**
**संस्मरणे ८०**
**लेखक आणि लेखने ८०**
**रंगरेषा ७५**
**निमित्तानिमित्ताने : राजीव गांधी (अनु.) ७०**

काव्यसंग्रह

**गोंदण ५०**
**अनोळख ५०**
**पूर्वसंध्या५०**
**मेघदूत (अनु.) ७०**

मेहता पब्लिशिंग हाऊस १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.


कुणीही शिरकाव आत ना
शके करू। कोश असा
भवती मी विणत राहिले.

## किनारे मनाचे : शांता शेळके

**संपादक : डॉ. प्रभा गणोरकर**

आळंदी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा आणि मराठीतील एक अग्रगण्य आत्मनिष्ठ गीतकार कवयित्री शान्ता शेळके यांच्या १३६ निवडक कवितांचा संग्रह 'किनारे मनाचे' या नावाने प्रसिद्ध झाला आहे. डॉ. प्रभा गणोरकर यांनी त्याचे संकलन केले आहे. त्यांची प्रदीर्घ प्रस्तावना शांताबाईंच्या विकासाची, काव्याची व मनाची वैशिष्ट्ये तरलपणे टिपणारी आहे, मर्मग्राही आहे.

शान्ताबाईंचे वर्षा (१९४७), रूपसी (१९५६), गोंदण (१९७५), अनोळख (१९८६), जन्मजान्हवी (१९९०), पूर्वसंध्या (१९९६) आणि इत्यर्थ (१९९९) असे सात काव्यसंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. १९४१ साली त्यांनी पहिली कविता लिहिली. ती शालापत्रक मासिकात प्रसिद्ध झाली. त्यावेळी त्या एस. पी. कॉलेजमध्ये बी ए च्या प्रथम वर्षात शिकत होत्या. रविकिरण मंडळाच्या कवितेचा त्यांच्यावर प्रभाव होता. वर्षा हा संग्रह माधव ज्यूलियन यांना अर्पण केला आहे. (डॉ. गणोरकर यांना 'वर्षा'तील कवितांवर कुसुमाग्रजांचा प्रभाव अधिक जाणवतो.) प्रा. रा. श्री. जोग यांनी वर्षाला प्रस्तावना लिहिली असून शांताबाईंच्या कवितेतील प्रसन्नता व सहजता, सरळ शुद्ध






आत्माविष्कार व मोकळा शृंगार यांचा उल्लेख केला आहे. या कवितेत गूढगुंजन व प्रतीकवाद नाही, प्रोषिताचे अवसान आणलेले नाही, क्रांतिकारकाचा अधिकार सांगून अंगार, ज्वाला, स्थंडिल वगैरेंचा बडिवार माजवलेला नाही, नव्या लिंगसंप्रदायाचा किंवा विकट पूजेचा (ग्रोटेस्क वरशिप) त्यात अंगीकार केलेला नाही, याबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. हे या कवितेचे स्वभावविशेष पुढे पन्नास साठ वर्षे तसेच टिकून राहिलेले दिसतात असे गणोरकरांना वाटते.

काव्य हे जीवनाचे सर्वस्व आहे, कवितेने सुखदुःखाच्या क्षणात आपली पाठराखण केली, काटेरी मार्गात फुलबाग फुलवली असे शांताबाई या संग्रहातील अनेक कवितांमध्ये नमूद करतात.

काव्यातील जीवन रंगले
जीवनातल्या काव्या मुकले. (पृष्ठ ८८)
प्रिय सखये! तव संगतीत मी
रंगविले अवघे मम जीवन
स्निग्ध जिव्हाळा तुझा लाभता
पाझर फुटले पाषाणातुन! (पृष्ठ ११७)

प्रीतिविषयक कवितांमध्येही काव्य हा मुख्य दुवा आहे, असा उल्लेख अनेक कवितांमध्ये येतो. 'हीच गीते वाचुनी तैं जाहले बेहोश मी.' 'काव्य तुझे वाचुनिया मन माझे हो वेडे' या सारख्या ओळीही खूप आहेत.

वर्षातील कवितांवरून आत्मशोध व आत्माविष्कार ही भावकवितांची लक्षणे अग्रभागी दिसतात. या सर्व कविता वृत्तबद्ध आहेत. गीत, गझल, सुनीत हे प्रकारही हाताळलेले आहेत. त्यांची परंपरा प्रियताही या कवितांतून प्रकट होते.

रूपसी या संग्रहात १९४७ ते १९५६ या काळातील कविता आहेत. कुसुमावती देशपांडे यांनी प्रस्तावनेत सहजता, सफाई, भेदक आत्मविश्लेषण, शांत प्रामाणिकपणा, विषण्णता या विशेषांचा उल्लेख केला आहे.

'गोंदण' मध्ये वीस वर्षांच्या कालावधीतील १०३ कविता आल्या आहेत. या संग्रहापासून त्यांच्या कवितेचे वेगळे वळण दिसते. ''प्रत्यक्ष अनुभूतीऐवजी अनुभूतीनंतरचे किंवा अनुभूतीतून स्फुरलेले चिंतन'' या कवितांमधून प्रथमच दिसू लागते. यांतील बहुतेक कविता प्रेमानुभवात जाणवणारा दुरावा, अंतर, पूर्वस्मृतींमुळे वाटणारे नैराश्य, जवळिकीतही जाणवणारे एकाकीपण व्यक्त करतात. 'पानोपानी मंद उन्हाचा उदासीन शिडकावा' दिसतो. संध्याकाळच्या काळोखातून जाणवणारा एकटेपणाही पुनःपुन्हा प्रकट होतो. ''अवघे नकार मनी दाटतात; हातात धरले हात सुटतात. पाहताना कधी मागे परतून पुसटही तेथे उरते ना खूप'' अशा भाववृत्तीचा आविष्कार वरचेवर होतो.

‘गोंदण’ पासून शांताबाईंची कविता अधिक भावगंभीर आणि अंतर्मुख झाल्याचे प्रभा गणोरकर नमूद करतात, मात्र शांताबाईंचे हे समग्र व स्थायी जीवनभान नाही असेही त्यांना वाटते. स्मरणरंजनाची असंख्य उदाहरणे या कवितांत दिसतात. आठवणीचे उल्लेख येतात. परंतु ते धूसर आहेत. कुठल्या आठवणी? त्या मोघमच आहेत. जातिवंत आत्माविष्कारापासून शांताबाईंनी स्वतःला सांभाळून ठेवले. ती कविता कुठलेही दाहक, जळजळीत, भ्रम-भय-एकाकीपणाचे अनुभव व्यक्त करीत नाही. स्वतःचे दुःख, अपमान, वंचना, पराभव, आत्मकरुणा या साऱ्या गोष्टी त्यांनी स्वतःशीच ठेवल्या; केवळ हे सर्व अनुभवल्यावर लाभलेला जीवनबोध त्यांनी शब्दरूपात मांडला.

‘पूर्वसंध्या’ मध्ये जीवन जाणिवेची व्यापकता आणि दृष्टीतील उदासीन खिन्नता निवळल्याचे दिसते. आत्मपरतेच्या पलीकडे जाणिवेचे क्षितिज विस्तारते. त्यांना आता ऐकू येते आहे एक निःशब्द धून.

या साऱ्या पलीकजे गूढपणे थरथरत राहणारी
रक्तातून सलग वाहणारी
एक शब्दहीन सुंदर धून

याशिवाय डॉ. गणोरकर आपल्या प्रस्तावनेत शब्दविषयक जाण, स्त्रीत्वाची जाण, यांच्याकडेही लक्ष वेधतात.

शेवटी त्या म्हणतात, ‘‘ही कविता कमी बोलणारी, म्हणून काहीशी संदिग्ध आहे. पण कोठेही दुर्बोध नाही. छंदोबद्ध, वृत्तबद्ध रचना, सुनीते... निर्दोष व अचूक आहे. एका मात्रेचाही दोष कोठे नाही की ओढाताण नाही. यावरून त्यांचे शब्द प्रभुत्व निर्विवाद दिसते. छंद, वृत्ते, सुनीते हे रचनाबंध वापरण्यात त्यांनी रुढ रीतींच्या विपरीत जाण्याचा बंडखोरपणाच दाखवला; पण तसा आविर्भाव न दाखवता त्यांनी मुक्तच्छंदही सहजपणे वापरला... सौंदर्यवादी, निर्भरशील व्यक्तित्वाचे सर्व विशेष मुखर करणारी ही कविता आहे.. स्वतःच्या स्वभावधर्मानुसार ती आपली वाट चोखाळत राहिली. आत्मपर, पण आत्मरत नव्हे, लोकप्रिय-पण लोकानुरंजन करणारी नव्हे, परंपराप्रिय-पण नवविमुख, जुनाट नव्हे, अशी सत्त्वशील, प्रसन्न, हृदयस्पर्शी आणि आंतरिक भावबळाने समृद्ध अशी शांताबाईंची कविता अस्तंगत होत चाललेल्या आधुनिक मराठी काव्यपरंपरेची अंतिम खूण आहे.’’

शांताबाईंची चित्रपट गीते स्वतंत्रपणे प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांचा विचार या प्रस्तावनेत केलेला नाही. गीत रचना आणि कविता यातील भेदाभेदाचा विचारही यात आलेला नाही. एका परीने गीत रचना हाही बाय प्रॉक्सी आत्माविष्कार असू शकतो. त्यामुळे कोणीतरी त्याचाही विचार करायला हवा.

संग्रहातील अनेक कविता मनाचा वेध घेणाऱ्या आहेत.



‘किनारे मनाचे’ या कवितेचे नाव संग्रहाला दिले आहे. ती कविता येथे देतो.

सुंदर उदास एकाकी किनारे मनाचे
पुढे अपार सागर अंतहीन
ज्याचा ठाव लागत नाही
अलीकडे माडांच्या झावळ्यांची मंद सळसळ
जी अन्तःस्थ गूज सांगत नाही.
दरम्यान, शुभ्र वाळूचा विस्तीर्ण पट्टा
त्यावर कोसळणाऱ्या, घुटमळणाऱ्या
परतणाऱ्या पराभूत लाटा,
आणि एक आकृती, पाठमोरी
पुढे पुढे जाणारी,
क्षणभरही मागे वळून न पाहणारी
तो चेहरा कुणाचा असेल?



‘आतले समुद्री आवेग’ या कवितेतही हे सूर अधिक गूढरम्य झालेले दिसतात.

आतले समुद्री आवेग
मनाच्या किनाऱ्यावर येऊन आदळतात
आणि तिथे हलके हलके ओसरत
लाटालाटांच्या वळणदार वर्तुळात
संथ साकळतात;
उमटवतात चित्रविचित्र आकृती
गोठून राहिलेल्या सुखदुःखांच्या स्मृती
ते असतात गतकाळाचे शिलालेख
दिङ्‌मूढ करणारे निरखताना एक एक..
दरवळत असतो भोवती
हृदय दुखवणारा ओलसर खारा वास
आणि माझ्यातून आरपार वाहणारे भास
मागे निश्चल उभे माड, झावळ्या, हालचाल विसरलेल्या
सावल्या भुतांसारख्या, वाळूवर ऐसपैस पसरलेल्या
वर आभाळाचा घुमट जांभई देणारा निर्विकार
जाणिवा अचेतन होत जाणाऱ्या
आणि अवघा आसमन्त केवळ एक शून्याकार. (१४७)

वाळूत घर बांधणाऱ्या, मातीच्या बोळक्यांतून सुखदुःख रांधणाऱ्या, श्वासातली अंतरे गीतांतून सांधू पाहणाऱ्या, आभास घेऊन तिमिरात नांदणाऱ्या, बंधने तोडण्याचे बळ नसल्याने आपल्या दुबळेपणाशी भांडणाऱ्या, असहाय वेदना उरातच कोंडून ठेवणाऱ्या कवयित्रीच्या अंतरंगाचा एक छेद– या कवितांमधून दिसतो. (९१) तिचे जन्मजान्हवीपण त्यातून प्रकटते. 'शब्दांसवे मी जन्मले, शब्दांतुनी मी वाढले, हा शाप हे वरदान हा दैवाने दिलेला वारसा' सांभाळत 'शब्दांमध्ये जगणे मला शब्दांमध्ये मरणे पुन्हा, हे अंतहीन समुद्रसे माझा परी दुबळा पसा' अशी खंतही कायम येथे उरतेच. (१४२) ''उभा अवकाश अनोळखी पुरुष, अवघे आसमन्त पारध, कोवळ्या पोरीतून उगवणारी स्त्री कूर, संशयी सावध (१६३) अशी भयभावनाही सतत साथीला असते. तरीही प्राणांहून हा रेशमी चुडा जपत काचांतून नाजूक किणकिणत राहण्याचा, आणि कुणीही शिरकाव करू शकणार नाही असा कोश स्वतःभोवती विणण्याचा उद्योग (१७६) शांताबाई जन्मभर करीत राहिल्या आहेत हे या कवितांद्वारेच त्या मोकळेपणाने उघड करतात. म्हणून ही कविता एक अंतर राखून असूनही वाचकांना नितान्त जवळची वाटते.

(पृष्ठे १७६ शंभर रुपये) सवलतीत ८५/- सभासदांना ७५/- पोस्टेज १५/-


**व. पु. काळे यांची वाचकप्रिय पुस्तके**


**कथासंग्रह**

वलय ८०
वपु ८५
मोडेन पण वाकणार नाही ७०



**ललित गद्य**




निमित्त ७०
वपु सांगे वडिलांची किर्ती ७०
फॅन्टसी एक प्रेयसी ८०
चिअर्स ७०
आपण सारे अर्जुन ८०

मेहता पब्लिशिंग हाऊस १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.




**व्यवहारचातुर्याची अमोघ सूत्रे स्पष्ट करणाऱ्या पंचतंत्रातील सदाबहार कथा**

## पंचतंत्र कथा

**अनिल किणीकर**

व्यवहारचातुर्य आणि मनुष्यस्वभाव यांतील बारकावे समजावून देणाऱ्या छोट्या छोट्या कथांचा खजिना 'पंचतंत्र'च्या रूपाने भारतीयांना आणि जगाला उपलब्ध झाला आहे. पंडित विष्णुशर्मा याने व्यवहारशून्य मंदमती आणि अध्ययनाबद्दल तिटकारा असणाऱ्या राजपुत्राला केवळ कथा सांगून समर्थपणे राज्यशकट हाकण्याएवढी तयारी एका वर्षाच्या अवधीत करून घेतली, ही घटनाच कथा या माध्यमाचा प्रभावीपणा प्रकट करणारी आहे. 'इसापनीती' प्रमाणेच पंचतंत्रातील कथा या मुलांना मुलांच्या पातळीवर रंजक वाटतातच, नकळत काही संस्कार व प्रबोधनही करतात. परंतु या कथा मुलांच्यासाठी नाहीत; त्या सर्व वयाच्या वाचकांसाठी आहेत. प्रौढ वाचकांना त्यांचे मर्म अधिक उमगते. त्यातील व्यवहारज्ञानाची व मानवी स्वभावाची जाण थक्क करते. म्हणूनच गेली दोन अडीच हजार वर्षे पंचतंत्रातील कथा या भारतीय मानसिकतेमध्ये, लोकसाहित्यात विविध रूपांनी आविष्कृत होत, आपले वैभव प्रकट करीत आहेत.

या पंचतंत्रातील काही निवडक कथा चार वेगवेगळ्या पुस्तकांच्या रूपात दिल्लीच्या डायमंड पॉकेट बुक्सने डबल क्राउन आकारात पूर्णपणे चार रंगी चित्रांसह आकर्षकपणे प्रसिद्ध केल्या आहेत. त्याचे हक्क मिळवून मेहता पब्लिशिंग हाऊसने ती पुस्तके मराठीत प्रसिद्ध केली आहेत. या कथांचे अनुवाद अनिल किणीकर यांनी केले आहेत. प्रत्येकी वीस रुपये एवढी माफक किंमत ठेवली आहे. त्यामुळे हा संचच पालकांनी मुलांना भेटीदाखल देण्यासारखा आहे. उत्तम निर्मिती मूल्यांमुळे तो पाश्चात्य पुस्तकांच्या तोडीचा झाला आहे. मुकेश नादान यांची चित्रे आकर्षक आहेत. मूळ संहिता डॉ. गिरिराज शरण अग्रवाल यांची आहे.

'पंचतंत्रातील बोधपर गोष्टी' या पुस्तकात बुद्धिमान ससा, ढोंगी बगळा, मूर्खाशी मैत्री,

चतुर कोल्हा, मूर्ख कासव आणि हंस, दुष्टाचा न्याय, नागदेवतेची सुवर्णमुद्रा या कथा आल्या आहेत. सिंहाला विहिरीतील पाण्यात डोकावण्यास सांगून, पाण्यात दिसणारे प्रतिबिंब हे प्रतिस्पर्ध्याचे आहे असे सांगून ससा त्याला विहिरीत उडी मारायला लावतो. या कथेचे तात्पर्य, ज्याच्याजवळ बुद्धी असते त्याच्याकडे शक्ती असते, असे दिले आहे.

एका झोपलेल्या राजाच्या नाकाजवळ घोटाळणारी माशी उडवून लावण्यासाठी त्याची सेवा करणारे माकड माशी मारण्यासाठी तलवारीचा वार करते. राजा मरतो.

या कथेचे तात्पर्य-विवेकी माणसाने माकडासारख्या मूर्ख सेवकाला नेमू नये.

'पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी' या पुस्तकात महान साधू आणि उंदरी, अविचाराचं फळ, राजकुमारी आणि साप, विद्या श्रेष्ठ की बुद्धी श्रेष्ठ, देश आपला भला, कबुतराचं बलिदान, धूर्त कोल्हा, चोर आणि ब्रह्मराक्षस या कथा आहेत. घरात पाळलेले मुंगुस मुलाकडे जाणाऱ्या सापाला मारून त्याचे प्राण वाचवते. पण बाहेरून आलेल्या आईला मुंगूसाच्या तोंडाला लागलेले रक्त पाहून त्याच्या डोक्यावर रागाने कळशी आदळते. नंतर तिला खरा प्रकार कळतो. आणि वाईट वाटते. तात्पर्य– अविचाराने केलेली कृती पश्चात्तापाला कारणीभूत होते.

'पंचतंत्रातील रोचक गोष्टी' मध्ये सुजाण शत्रुत्व, चातुर्य (कावळ्याची अंडी खाणाऱ्या सर्पाचा कावळ्याने युक्तीने घेतलेला सूड), कपटी मित्र (कोल्हा व चित्ता यांनी केलेली उंटाची हत्या), संन्यासी व उंदीर, मित्रासाठी (चित्रग्रीव कबुतराने उंदराच्या मदतीने शिकाऱ्याच्या जाळ्यातून आपली सुटका करून घेतली), जशास तसे, तीन डाकू आणि ब्राह्मण या कथांचा समावेश आहे. उंदरांनी तराजू खाल्ला ही शेठजीची थाप स्वीकारून व्यापारी पुत्र 'ससाण्यानं तुमच्या मुलाला पळवून नेलं' असे त्याला सांगतो. ''हे कसे शक्य आहे?'' या शेठजींच्या प्रश्नावर तो व्यापारी पुत्र म्हणतो, ''एक हजार शेर वजनाचा लोखंडी तराजू उंदीर पचवू शकतो तर ससाणा मुलाला का नाही उचलून नेणार?'' न्यायालयात या युक्तिवादापुढे शेठजींची बनवाबनवी उघडकीला येते.

'पंचतंत्रातील प्रेरक गोष्टी' या पुस्तकात आवाजानं गुपित फोडलं, बोलणारी गुहा, मुंडन-पर्व, नकली युधिष्ठिर, हुशार माकड आणि लोभी माणूस व चक्र या सहा कथा आहेत. एका माणसाच्या डोक्यावर चक्र फिरत असलेले पाहून ते चक्र का फिरतेय असे विचारणाऱ्या माणसाच्या डोक्यावर ते चक्र येऊन फिरू लागते. यक्षराज कुबेराने लोभी माणसांना धडा शिकवण्यासाठी या चक्राची योजना केलेली आहे हे त्याला नंतर कळते.

बायका रागावल्या म्हणजे नवऱ्याला वाटेल ते करायला लावतात असे 'मुंडन पर्व' या कथेत दाखवले आहे. राजा नंद याला त्याची पट्टराणी ''तुम्ही घोड्याप्रमाणे आपल्या तोंडात लगाम घाला, घोड्याप्रमाणे खिंकाळा, मग मी तुमच्यावर स्वार होईन'' असे सांगते. नंद राजा हा मोठा पराक्रमी आणि शक्तिमान. पण बायकोच्या हट्टापुढे त्याचे काही चालत नाही. तो चक्क तिच्या म्हणण्याप्रमाणे घोड्यासारखा लगाम घालून खिंकाळू लागतो. त्याचा पंतप्रधान



वररुची याची बायको वररुचीला मुंडन करा म्हणते. वररुचीलाही बायकोचे म्हणणे मान्य करून डोक्यावरचे केस काढावे लागतात. 'पंचतंत्रातील प्रेरक गोष्टी' मधील ही कथा आजच्या काळातील समस्त बायकांना प्रेरणा देणारी ठरायला हरकत नसावी. नवऱ्याला हवी तशी वेसण घालण्याचा सल्ला दोन अडीच हजार वर्षांपूर्वीच पंडित विष्णुशर्मानि देऊन ठेवलेला आहे. पंचतंत्रातल्या गोष्टी आजही वाचकांना प्रेरक का वाटतात हे देखील यावरून लक्षात येईल. प्रत्येक काळाला अनुरूप संदेश देणाऱ्या कथांची त्यात लयलूट आहे. पंडित विष्णुशर्मानि खरोखर कमाल केली आहे!

पृष्ठे प्रत्येकी ३२. प्रत्येकी वीस रुपये.

चारही पुस्तकांचा संच-सवलतीत ६८/- ग्रंथजगतच्या सभासदास ६०/- पोस्टेज १५/-

## लेखिकांवरील सेन्सॉरशिप

'विमेन्स वर्ल्ड' (विमेन्स वर्ल्ड ऑर्गनायझेशन फॉर राइटस्, लिटरेचर ॲण्ड डेव्हलपमेंट) या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या वतीने महाराष्ट्रातील लेखिकांची एक कार्यशाळा खंडाळ्याच्या निसर्गरम्य परिसरात आयोजित करण्यात आली होती. १९८६ साली सुरू झालेल्या पेन या आंतरराष्ट्रीय संस्थेचा पाठिंबा या संस्थेला आहे. दिल्लीच्या रितू मेनन या भारताच्या प्रतिनिधी म्हणून आणि महाराष्ट्रातून गौरी साळवी या संस्थेचे काम पाहतात.

भारतातील सर्व राज्यांतील लेखिकांचे प्रश्न समजावून घेणे, एकूण सांस्कृतिक संघर्षातील भूमिका जाणून घेणे व लिंगभेदावर आधारित नियंत्रणपद्धतीवर (सेन्सॉरशिपवर) चर्चा घडवून त्यावर मार्ग काढणे हा या कार्यशाळेचा उद्देश होता. लिंगभेदावर आधारित असलेली नियंत्रणपद्धती आणि त्यावर प्रतिबंध घालण्यासाठी करावयाचे उपाययोजन, वेगवेगळ्या देशातील लेखिकांना कोणत्या प्रकारच्या नियंत्रणपद्धतीला सामोरं जावं लागतं याचं विवेचन करून, एकूणच जगात स्त्री चळवळीचं व स्त्री लेखिकांचं स्थान नेमकं काय आहे, यावरही प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

लेखकाच्या आवाजाची गळेचेपी करणे अशी नियंत्रण पद्धतीची सोपी व्याख्या करता येईल. लिंगभेदावर आधारलेल्या नियंत्रण पद्धतीची व्याख्या करताना ही संस्था म्हणते,

**ग्रंथप्रेमींसाठी खुषखबर !**

आपल्यासाठी आम्ही एक आकर्षक सवलत योजना जाहीर करीत आहोत. आपण मे ९९ पासून १० महिने दरमहा १०० रु. ची मनीऑर्डर पाठवा. मार्च २००० मध्ये १५०० रुपयांची आपल्या पसंतीची पुस्तके आम्ही आमच्या खर्चाने पाठवू. त्वरा करा. या योजनेचे सभासद व्हा व दर्जेदार पुस्तके घरपोच मिळवा.

**आमचा पत्ता :** मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६ सदाशिव पेठ, पुणे ३०

## फुले आणि काटे

प्रस्थापित तत्वप्रणालींना धरून नसणाऱ्या कल्पना आणि कलाकृती, संबंधित रसिकवर्गापर्यंत पोहोचू न देण्यासाठी जे जे मार्ग वापरले जातात, ज्या पद्धती वापरल्या जातात, त्या पद्धतीनांच नियंत्रण पद्धती असे म्हणतात.

या संस्थेच्या मते स्त्रियांवर असलेल्या नियंत्रणात केवळ सरकारी कर्मचारी, धर्ममार्तंड, सैनिकी हुकूमशाहीतील सैनिक, यांचाच हात असतो असं नाही तर यात मुलीच्या शिक्षणावर खर्च करणे म्हणजे पैशाचा अपव्यय आहे असं समजणारे पालक, मातृत्वातच स्त्री जीवनाची इतिकर्तव्यता असते असे सांगून स्त्रीच्या महत्त्वाकांक्षेचे पंख कापणारे शिक्षक, स्त्रियांनी लिहिलेली पुस्तकं प्रकाशित करण्यात कमीपणा मानणारे प्रकाशक, स्त्रियांच्या लिखाणाची गांभीर्याने दखल न घेणारे समीक्षक, आपल्या मुलीची अथवा बायकोची स्वतंत्र ओळख असावी हे मान्य नसणारे व त्यासाठी त्यांची हस्तलिखिते बदलणारे किंवा क्वचितप्रसंगी ती दडपून टाकणारे तसेच त्यांच्या लिखाणावर मालकी हक्क सांगणारे वडील व नवरे यांचाही यात समावेश होतो.

या सर्व नियंत्रणपद्धतीबरोबरच स्वतःच्या कुटुंबियांकडून किंवा आप्तस्वकीयांकडून आणल्या जाणाऱ्या अशा दबावांमधूनच स्व-नियंत्रण पद्धती या सर्वात व्यापक नियंत्रण पद्धतीचा जन्म होतो. सत्य सर्वांसमोर मांडल्यावर होणाऱ्या परिणामांना सामोर जाण्याची तयारी नसल्यामुळं ही अशी स्व-नियंत्रण पद्धती लेखिका स्वतःवर लादून घेत असतात.

या अशा विविध नियंत्रण पद्धतीची उदाहरणे मला वेगवेगळ्या अर्थानं अतिशय महत्त्वाची वाटतात. ही निवडक उदाहरणं पाहिल्यावर आपल्या देशातही यातील सर्वच प्रकारच्या नसल्या तरी काही नियंत्रण पद्धती कार्यरत आहेत हे सभोवतालच्या परिस्थितीचा विचार केल्यावर लक्षात येईल.

अल्जेरियामध्ये इस्लामी लष्कराने स्त्रियांना, विशेषतः सुशिक्षित, आधुनिक स्त्रियांना व स्त्री पत्रकारांना बलात्कार व हत्येचे लक्ष्य बनविले आहे. येथे लहान मुलींना त्या शाळेत जातात म्हणून मारण्यात येते, तर १९८२ पासून जवळजवळ २०० हून अधिक लेखिका



व स्त्री पत्रकारांच्या हत्या करण्यात आल्या आहेत. केनियामध्ये मुलींच्या वसतिगृहात सतत सामूहिक बलात्कारांचे प्रकार घडत आहेत.

रशियामध्ये एकेकाळी स्त्री-पुरुष दोघांनाही समान संधी मिळत होती. पण आज उच्च शिक्षण केवळ मुलांसाठी मर्यादित असावं आणि मुलींनी पुन्हा एकदा चूल आणि मूल या त्यांच्या निसर्गानं लादलेल्या भागधेयाला सामोरे जावं असं जनमत तयार होत आहे. उच्च शिक्षणातील हा भेदभाव उत्तर अमेरिकेतही दिसून येतो. तेथे शस्त्रक्रिया, अभियांत्रिकी, अणुशास्त्र, यासारख्या क्षेत्रांमधून स्त्रियांना जवळजवळ वगळण्यात येतं. ज्या तेथपर्यंत पोचण्याचा प्रयत्न करतात त्यांना त्यांच्या स्त्रीत्वाविषयीच्या टिंगलटवाळीपासून ते हत्येपर्यंत कोणत्याही परिणामाला सामोरे जाव लागतं.

जवळजवळ सर्वच देशांमध्ये लेखिकांची टिंगलटवाळी केली जाते. १९८६ साली आंतरराष्ट्रीय PEN या संस्थेच्या सभेत भाग घेतलेल्या ११७ विचारवंतांपैकी केवळ १६ स्त्रिया होत्या. त्याच्या निषेधार्थ लेखिकांनी मोर्चा नेला तेव्हा त्याचे स्पष्टीकरण देताना या संस्थेचे अध्यक्ष नॉर्मन मेलर म्हणाले, हे बुद्धिवंतांचं संमेलन आहे आणि बुद्धिवंत म्हणाव्यात अशा फारच थोड्या स्त्रिया असल्याने स्त्रिया असल्याने स्त्री वक्तव्यांची संख्या इतकी कमी आहे. मोर्चा नेणाऱ्या लेखिकांबद्दल शेरा मारताना ते पुढं म्हणतात, या बायकांचं पुरुषांना आपल्या मोहपाशात अडकवायचं वय निघून गेल्यामुळे आता त्या उगाच लहान लहान गोष्टींचा कीस काढताहेत. रशियामध्ये स्त्रियांचे बरेचसे लिखाण हे दुय्यम दर्जाचं असल्याचा शेरा तर मारला जातोच पण शरीर किंवा कामजीवनाबद्दल लिहिणाऱ्या लेखिकांची गणना वाईट बायकांमध्येही केली जाते. रशियातील प्रकाशन संस्था देखील लेखकांच्या लिखाणाला प्राधान्य देतात आणि लेखिकांचे लेखन केवळ जागतिक महिला दिनी म्हणजे ८ मार्चला प्रकाशित करतात.

भारतातील स्थितीबद्दल लिहिताना रितू मेनन म्हणतात, लिंगाधारित दृष्टिकोनातून लिहिणाऱ्यांवर पूर्वग्रहातून किंवा अपुऱ्या विद्वतेतून लिहिण्याचा आरोप केला जातो आणि ज्या राजकारणात कार्यरत आहेत त्यांना प्रत्यक्ष कार्यात वेळ न दवडता काहीतरी अधिक विद्वत्तापूर्ण करण्याचा उपदेश केला जातो. काही देशात स्त्रियांचं लेखन प्रसिद्धच केले जात नाही. स्त्रियांनी लिहूच नये अशा मताची काही मंडळी असतात तर त्यांना अपेक्षित असणाऱ्या प्रकारात स्त्रियांचे लेखन बसत नाही असे वाटल्याने ही मंडळी ते लेखन प्रसिद्धच करत नाहीत. सर्वसाधारणपणे समाजानं आखून दिलेल्या नियमांनुसार अयोग्य असलेल्या विषयांवर लिहिण्याचं धाडस करणाऱ्या लेखिकांना या नियंत्रण पद्धतीला तोंड द्यावं लागतं.

जर्मनी, अमेरिका, रशिया, फ्रान्स यासारख्या प्रगत देशांतही बलात्कार करणं, फोनवरून अश्लील बोलणं किंवा ठार मारण्याच्या धमक्या देणे, लेखन प्रसिद्ध करण्यामध्ये अडथळे आणणे, समीक्षकांनी दखल न घेणं, अथवा अशा लेखिकांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविणे

असे नियंत्रणाचे विविध प्रकार वापरले जातात.

अर्थात या सर्व नियंत्रण पद्धतींना तोंड देऊन समर्थपणे लेखन करणाऱ्या लेखिकाही आपल्याला सर्वत्र दिसतात. चीनमधील लेखिका व्यक्तिगत जीवन व लैंगिकता या विषयावर निर्धारानं लिहितात. गर्भपाताची सक्ती, एकच अपत्य असण्याचा नियम, तुरुंगातील छावण्या व स्त्रिया आणि लहान मुलांचा बाजार, वैवाहिक बलात्कार अशा महत्त्वाच्या मुद्यांना त्या आपल्या लेखनातून वाचा फोडत आहेत. लॅटिन अमेरिकेतील लेखिकाही त्यांच्यावर लावलेल्या लेस्बियन या लेबलाची पर्वा न करता पुरुषप्रधान संस्कृतीविरोधात सातत्यानं लेखन करत आहेत.

एकूणच अशा प्रकारच्या नियंत्रणपद्धतीविरुद्ध लढा देण्याची वेळ आता आलेली आहे असं या संस्थेला वाटत आहे. आपल्या जीवनातील विविध अनुभवांना शब्दबद्ध करून आता स्त्रियांनी स्वतःला व्यक्त करायला हवं. जरी त्यांच्या जगण्यात व लिखाणात अंतर्विरोध असेल तरी तो समजावून घ्यायला हवा कारण अंतर्विरोधी असण्याचा वा वादग्रस्त मते व्यक्त करण्याचा पुरुषांएवढा स्त्रियांनाही अधिकार आहे. म्हणूनच जगाच्या सांस्कृतिक विकासात स्त्रीला एक परिपूर्ण माणूस म्हणून स्थान मिळवून देण्यासाठी तिला जे वाटते, जाणवते ते व्यक्त करण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यासाठी या नियंत्रण पद्धतींना धाडसानं सामोरे जाऊन स्त्रियांनी आपली मतं निःसंकोचपणे मांडण्याची वेळ आली आहे असं या संस्थेला वाटतं.

**— नीरजा (सांज मुंबई तरुण भारत)**

जुलै अंकातील फँटसी-एक प्रेयसी या पुस्तकावरील मजकूर वाचताना भरून आले. 'कन्यादान करताना प्रत्येक पिता मूक होतो. कदाचित तो जावयाला सांगू शकत नसेल की बाबा रे, माझ्या मुलीचा पती असूनसुद्धा तू तिचा पित्यासारखा सांभाळ कर.' हे बोल फारच मार्मिक आहेत. आयडियल बुक डेपोचे कांताशेठ नेरूरकर यांचे 'माणसं माणसांना माणसातून उठवतात. पण पुस्तकं माणसाला सामावून घेतात.' हे विधानही मनाला दिलासा देणारे आहे. माझ्या जीवनातील एका वैयक्तिक घटनेमुळे मी मनाच्या विकल अवस्थेत असताना मला मराठी ग्रंथजगतने खूप मानसिक बळ दिले. भावनात्मक साथ दिली. माझे जीवनसाथी ८ मे रोजी एका छोट्या शस्त्रक्रियेनंतर शुद्धीवर न येताच मला सोडून गेले. त्या शोकाकुल अवस्थेतून सावरण्यासाठी ग्रंथजगतमधील लेखांमधून व्यक्त झालेली जीवनविषयक अंतर्दृष्टी देणारी मार्गदर्शक सूत्रे बहुमोलाची ठरतात. पुस्तकांद्वारे नकळत दिशा दिसत जाते. दुःख हलके होते. आपल्याला व ग्रंथजगतला धन्यवाद.

**— आशा जळगावकर,** उच्चतर माध्यमिक विद्यालय, खोकरी ४६४ ३३९, मध्यप्रदेश

मराठी ग्रंथजगतच्या आजवरच्या उल्लेखनीय प्रगतीबद्दल अभिनंदन. पुस्तकांचे परिचय, पुरस्कार वगैरे माहितीमुळे वाचक व लेखक यांचे परस्पर जिव्हाळ्याचे नाते निर्माण होते.



## वाचकांचा पत्रव्यवहार

लेखकांचे पत्ते दिले तर वाचक त्यांच्याशी सरळ संपर्क साधू शकतील.

**— मोहन पवार,**
तांदुळवाडी, कोरेगाव
(सातारा).

जुलै १९९९ चा 'मेहता मराठी ग्रंथजगत'चा 'वपु' विशेषांक वाचला. खूप आवडला. वपुंचं मनोगत त्यांच्या सर्वच लिखाणाप्रमाणे मनाला भावून गेलं. त्यांच्या काही पुस्तकांचा परिचयही अंकामध्ये आहे. वाचलेल्यांसाठी तो पुन्हा अनुभव होता, नवीन वाचकांचे औत्सुक्य जागवणारा दे. एकूण विशेषांकात भर टाकणारा होता.

'आपण सारे अर्जुन' ह्या पुस्तकाचे वाचन अनेकवेळा झाले. आम्ही अनेक जणांनी एकमेकांना सांगत, चर्चा करत हे पुस्तक वाचले. विकत घेतले. त्या पुस्तकातील उल्लेखावरून अशा तऱ्हेचे आणखी काही विचार वपुंच्या ह्या पुढील पुस्तकातून आपल्यालामिळतील अस वाटलं. पण सध्या तरी हा योग दिसत नाही. ही एकच गोष्ट मनाला आनंद देणारी नव्हती.

एकूणच 'ग्रंथजगत' या सारखं मासिक ही एक गरज आहे असं वाटतं. विविध पुस्तक प्रदर्शनांच्या निमित्ताने वाचक पुस्तकाकडे जातो. पण वाचकांपर्यंत पुस्तक नेण्याचे, त्याची ओळख करून देण्याचं कार्य नियमितपणे ग्रंथजगत करत आहे. पुस्तकाचा परिचय करून दिल्याने कोणते पुस्तक आपल्याला आवडेल, ग्रंथालयातून किंवा विकत घेऊन वाचावेसे वाटेल याचा अंदाज वाचकाला घेता येतो. माहीत नसलेली विविध विषयांवरील, विविध लेखकांची, विविध प्रकारची पुस्तके वाचकाला माहीत होतात. काही वेळेला पुस्तक विषय-लेखक-प्रकार यावरून पुस्तक विकत घेतलं जातं. वाचल्यावर असं जाणवतं की उगाचच पुस्तक विकत घेतलं. किंमती जास्त-- पुस्तक समाधान देत नाही. (किंमती बाबतीची तक्रार काही वेळेला लटकीच असते. साडी खरेदी करताना, बाहेर चैन करताना बजेट वाढलं तरी मनाला काही वाटत नाही!) ग्रंथजगत सारख्या मासिकातून पुस्तकाचा परिचय होत असल्याने हा धोका टळला म्हणायचा.

जाने. ९९ च्या अंकात मेहता प्रकाशनाच्या पुस्तकांची यादी प्रसिद्ध झाली आहे. लेखक, विषय, प्रकार यांची विविधता कौतुकास्पद आहे. अनेक गाजलेली, सुप्रसिद्ध, पुरस्कारप्राप्त पुस्तके त्यात आहेत.

'साहित्य वार्ता' हे सदरही वाचकाला बरेच काही देऊन जाते.

बालवाचकांसाठी ग्रंथजगतचा अंक हाही एक चांगला उपक्रम.

'वपु' विशेषांकाचा आणखी एक अभिनंदनीय उल्लेख म्हणजे व्यावहारिक पातळीवर विचार करता वपुंच्या पुस्तकांसाठी ग्रंथजगतच्या सभासदांना दिलेली किंमतीतील सवलतही आकर्षक आहे.

**– सौ. मीना कुलकर्णी,** कोल्हापूर

**अभिनंदन**

द फेडरेशन ऑफ एज्युकेशनल पब्लिशर्स दिल्ली यांच्या वतीने दरवर्षी उत्कृष्ट पुस्तक निर्मिती पुरस्कार देण्यात येतो. उच्च माध्यमिक स्तरावरील पुस्तकांसाठी देण्यात येणारा पुरस्कार यावर्षी हिरवे जनुक मराठी अनुवाद प्रमोद जोगळेकर या मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे प्रकाशित झालेल्या पुस्तकास देण्यात आला. श्री. प्रमोद जोगळेकर यांचे हार्दिक अभिनंदन!




- सप्टेंबर १९९९
- वर्ष तिसरे
- अंक नववा


# मेहता मराठी ग्रंथजगत

## – अनुक्रमणिका –


**संपादकीय** ........ २

**साहित्यवार्ता** ........ ६

**पुस्तक परिचय**

**मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही (ओशो)** ........ १६

**ध्यानसूत्र (ओशो)** ........ २१

**हसत-खेळत ध्यानधारणा (ओशो)** ........ २६

**नष्ट मेयेर नष्ट गद्य (तसलिमा नासरिन)** ........ ३०

**किनारे मनाचे : शान्ता शेळके** ........ ३५

**पंचतंत्रातील कथा** ........ ४१

**नवीन स्पर्धा** ........ १५

**स्पर्धा निकाल** ........ २०

**फुले आणि काटे** ........ ४४

**वाचकांचा प्रतिसाद** ........ ४७



- संपादक सुनील मेहता
- कार्यकारी संपादक शंकर सारडा
- संपादन सहाय्य सुनीता दांडेकर
- अंकाची किंमत १० रु. वार्षिक वर्गणी ८० रु.
- वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी
- प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस

***संपादक-मुद्रक-प्रकाशक :* सुनील मेहता,** मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०.

***मांडणी-अक्षरजुळणी : मेहता पब्लिशिंग हाऊस,*** १२१६ सदाशिव पेठ, पुणे-३०.

फॅक्स : ०२०-४४७५४६२


*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*




## प्रवाह

**पांडुरंग कुंभार**

### ग्रामीण जीवनातील कौटुंबिक ताणतणाव आणि मनस्वी व्यक्तिमत्त्वे यांचा मेळ

''रांडमुंड बाई म्या. दोन वर्सबी संसार केला न्हाई. माझं कपाळ पांढरं झालं. कुणाचा आधार न्हाई. पण वाघागत दोन दीर हाईत म्हणून माझा कढ आवरला. चुलत दीर असूनही सख्खे दीर मानून त्यांच्यासंगं वागले. पण जानणूक ठेवली न्हाई त्यांनी. तीन तीन पोरांचं बाप झाल्यात पण शेण खायला वखवखल्यात.'' स्वतःच शेतावर राबणारी गौरा गव्हाळी चेहऱ्यावर संताप फुलवत मानेला हिसडा देत आपली कैफियत वैजनाथ सरपंचाला सांगते.

गोविंदा आणि पिराजी हे गौराचे दीर. त्यांना वैजनाथ समजावून सांगतो. गौराला मदत करायला, धीर द्यायला हवा असं सुचवतो. पण ते आडमुठे. ''जित्ती गाडीन तिला तवाच थंड व्हईल आमचा जीव!'' असं गोविंदा म्हणतो. नांगरटीचा हंगाम आल्यावर गोविंदा गौराला भेटून सांगतो, ''आवंदापासून सारी कामं आमीच करनार. तू तिकडं फिरकायचं नाहीस.'' तर गौरा म्हणते, ''माझं जीवमान हाय तोवर माझ्या शेतात तुमी पाऊल टाकायचं कारण न्हाई. माझं म्या करनार.'' गोविंदा चिडतो. ''तोंड वर करून आमास बोलतीस? तुझा मुडदा पाडतो. जीव घेतो. फाशी जातो'' म्हणत तो थोरला दीर तिच्या घरात शिरू पाहतो. ती ओरडते. शेजारीपाजारी गोळा होतात. तक्रार सरपंचाकडे येते.

सरपंच गौराच्या सोबतीला राहण्यासाठी साठी ओलांडलेल्या सच्छील चांगदेवमामाला तयार करतो. तर त्याच्या घरावर दगड पडू लागतात.

''तुझं शेत मला करायला दे. तू सांगशील त्या परमानं खंड भरीन.'' अशी तयारी वैजनाथ सरपंच दाखवतो, तेव्हा गौरा कृतज्ञतेच्या भावनेने म्हणते, ''माझ्या परसंगाला तुमी थोरल्या भावागत माझ्या मागं उभा ऱ्हायलासा. माझी सोय लावलासा. तुमचं उपकार ह्या जन्मात फिटनार न्हाईत.'' पण खंडाने शेत मागणाऱ्या वैजनाथला गौरा शेताबाबत मात्र स्पष्ट नकार देते. ''माझ्या जीवात जीव तवर माझी जमीन म्या करीन. त्यात दुसऱ्याला पाऊल टाकू द्यायची न्हाई. नवरा गेला पन म्या दुसरा घरोबा केला न्हाई. वय असून म्या तशी ऱ्हायले. मला सुख न्हाई असं समजून ऱ्हायले. आज भाऊ म्हणून समोर हाईसा. आज तुमच्या समूर तोंडातनं शब्द बाहीर पडल्यात.'' सरपंच वैजनाथ त्या नकारामुळे काय करतो? शेत खंडावर मागण्यामागे त्याचा काय हेतू असतो?.. गोविंदाला भेटून तो 'आजपासून आमी तुमचं. तुमी आमचं... काय वाटेल ते करा. आमी इचारनार न्हाई. अगदी पोराशपथ.' असं का सांगतो? गोविंदाची प्रतिक्रिया त्यावर काय होते? गोविंदा देवमामाला भेटून 'आमचं डोळं उघडलं.. आमी सरळ मनानंच वागू. तिच्याकडं कुनी नजर वर करून पाहिलं तर त्याचं डोळं काढून भिंतीला लावू' असं का सांगतो?

चांगदेवमामा गौराला पाहून तिच्या मोहात पडतो.

परंतु चांदवडीच्या भगवंतराव जाधवांचे स्थळ गौरासाठी येते तेव्हा चांगदेवमामा तिच्या भल्याचाच निर्णय घेतो. ''गेल्या चाळीस वर्षांची इठ्ठलाची सेवा काय वाया गेली न्हाई. राती इठ्ठलानं मला जागवलं. त्या भोवऱ्यातनं त्यानंच मला बाहीर काढलं. न्हाईतर पापाचा धनी झालो असतो मी! माझा इठ्ठल तुझं भलंच करंल.''

असा हा दीर भावजय संघर्ष, सरपंचाच्या मनातील हेलकावे, चांगदेव मामाच्या मनातील भोवरा यांचा गुंतागुंतीचा पट पांडुरंग कुंभार यांनी भोवरा या कथेत समोर पसरला आहे.

'धार' या दीर्घकथेतही इस्टेटीची, शेताची वाटणी हाच विषय आहे. मुंबईत नोकरी करून अधूनमधून पैसे पाठवणारा हनुमंत आपल्या शेतावर राबणाऱ्या यशवंत या भावावर वाटणीसाठी कोर्टात दावा लावतो. गावातले पंच जमवून वाटणीच्या वाटाघाटी होतात, परंतु त्या फिसकटतात. वकिलांची धन होत जाते. बदसल्ला देणारे आगीत तेल ओतत जातात. आणि यशवंता अखेर ठरवतो,'' आता ही कोर्टकचेरी बास झाली. राब राब राबायचं आणि इर्षेला पडून कुनाचं तरी फुकटात घर भरायचं. त्यापरीस खाल्लं तर त्योच खाऊ दे. किती केलं तरी भाऊच हाय त्यो.. या धारेतनं बाहीर पडाय पायजे. न्हाईतर या धारेबरोबर दोघंबी कुठं जाऊ ते समजायचं नाही. काठ हाताला लागायचा नाही.'' आणि हे बोलून झाल्यावर त्याच्या मनावरचं ओझं उतरतं.

पांडुरंग कुंभार हे रणजित देसाई यांच्या मर्जीतले त्यांचे लेखनकार. रणजित देसाई यांच्या

म्हणत. नीरद बाबूंच्या या तऱ्हेवाईक व्यक्तिमत्त्वाचे कुतूहल दीर्घकाळ वाटत राहील.

## इंटरनेटवर ग्रंथविक्रीच्या संधी

*ॲमेझॉन कॉम,*

*बार्नेस ॲंड नोबल कॉम,*

ही इंटरनेटवरील पुस्तकांची दुकाने एकमेकांशी जबरदस्त स्पर्धा करणारी मानली जातात. इंग्लिश भाषेतील कोणतेही पुस्तक हवे असेल तर त्यासाठी या ग्रंथविक्रीकेंद्राचे सहाय्य घ्यायला हरकत नाही. अक्षरशः लाखो पुस्तके वेबसाइटवर उपलब्ध आहेत. दुर्मिळ, जुनी, वापरलेली पुस्तकेही तुम्हाला 'बुक फाइंडर.कॉम' वरून मिळवता येतात. जगातील हजारो ग्रंथविक्रेत्यांकडे असणाऱ्या जुन्या पुस्तकांची माहिती या वेबसाइटवर मिळू शकते. ॲडव्हान्स्ड बुक एक्स्चेंज (ABE CWWW.abebooks.com) या इंटरनेट दुकानात ४६०० पुस्तक विक्रेत्यांकडील १ कोटी १० लाख पुस्तकांची नोंद आहे. ॲमेझॉन कॉम कडे मात्र जुन्या पुस्तकांची मागणी नोंदवू नये, पुस्तक शोधण्यासाठी ॲमेझॉन. कॉम मोठे शुल्क आकारते. पुस्तकाच्या किंमतीपेक्षाही हे शुल्क कितीतरी पट जास्त असू शकते. त्यामुळे त्यासाठी स्वतःच शोध घेणे फायदेशीर ठरते.


बुकफाइंडर.कॉम (www.bookfinder.com) या साइटवरूनही जुन्या पुस्तकांचा तसेच कुठल्याही नव्या पुस्तकाचा तपास लावता येतो. जुन्या पुस्तकाची अवस्था कशी आहे हेही स्पष्ट दिलेले असते.

तंत्रज्ञानावरील पुस्तकांसाठी पोर्टलॅंड-मधील पॉवेल्स या ग्रंथविक्रेत्याची ख्याती आहे. त्यांच्या वेबसाइटचे नाव आहे (www.powells.com)

इंग्लिश व्यतिरिक्त अन्य जागतिक भाषांसाठीही अशा वेबसाइट आता तयार होऊ लागल्या आहेत. केंबिज-मॅसॅच्युसेटस येथील शोएनहॉफ या विक्रेत्याकडे निरनिराळ्या ४०० भाषांतील शब्दकोश, व्याकरण, अंकलिप्या, ज्ञानकोश उपलब्ध आहेत. साइटचे नाव आहे. www.schoenhofs.com.

इंटरनेटवरील जगातील सर्वात मोठी पुस्तक प्रकाशन-विक्री क्षेत्रातील संस्था म्हणून बार्नेस ॲंड नोबल या संस्थेचा दबदबा आहे. तिच्यापुढे ॲमेझानने आता मोठेच आव्हान उभे केले आहे. ॲमेझानने बेस्टसेलर पुस्तकांवर चाळीस-पन्नास टक्के सवलत देऊन ग्रंथ ग्राहकांना आकृष्ट करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

मराठी पुस्तकांनाही इंटरनेटमुळे अधिक मागणी येऊ शकेल. घरोघर संगणक-इंटरनेट होणे त्यासाठी आवश्यक आहे. येत्या पाचदहा वर्षात टेलिव्हिजनप्रमाणेच संगणकही घरोघर पोचतील. भावी काळ हा आशादायक आहे असे मानून पुढे जायला हवे.



– संपादक